उत्कृष्ठ क्वालिटी
जिरे २८०/- रु. किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२७२ ■ रविवार ५ जुलै २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८

POST REGD.No./DHL/53/24-26

डॉ.गौतम शाह धुळ्यात उपलब्ध
गुडघे दुखी, कंबरदुखी, स्लीप डिस्क, संधीवात, सायटीका या रुणावर ओझोन थेरपी व गुडघ्याची इंजेक्शन थेरपीने यशस्वी उपचार
दि.६ जुलै ते १० जुलै २०२६ या कालावधीत धुळे येथे उपलब्ध असणार आहेत. स.१० ते २ दु.
संपर्क :- डॉ.गौतम शाह M.S. (ऑर्थो) शाह क्लिनिक
श्री.विठ्ठल हॉस्पीटल, जुने आस्था हॉस्पीटल, रामवाडीसमोर, मालेगावरोड, धुळे (फोन नं.०२५६२-२३५११३)
भ्रमणध्वनी-०८६००३५१०००/९८८१२७८६९८

## राज्यात मुसळधार पावसामुळे आपत्कालीन यंत्रणा हाय अलर्टवर; घराबाहेर पडू नये- मुख्यमंत्र्यांचे आवाहन

**मुंबई, दि.४- हवामान विभागाकडून दि.४ जुलै मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे आणि रायगड या जिल्ह्यांना पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने सर्व यंत्रणा सतर्क केल्या असून, महापालिका, आपत्ती व्यवस्थापन विभाग, अग्निशमन दल आणि इतर आपत्कालीन यंत्रणा हाय अलर्टवर आहेत. तसेच नागरिकांनी अत्यावश्यक काम असल्याशिवाय घराबाहेर पडू नये, सखल भाग, समुद्रकिनारे आणि धोकादायक ठिकाणी जाणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. त्यानंतर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील नागरिकांना महत्त्वाचं आवाहन केलं आहे.**



माध्यमांशी संवाद साधताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यामध्ये विशेषतः एमएमआर रिजन असेल ठाणे, रायगड, पालघर असेल पुण्याचा काही भाग असेल नाशिकचा काही भाग असेल आणि इतरही काही भागांमध्ये अतिशय मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे कालपासून आपण वेगवेगळे अलर्ट दिलेले आहेत. विशेषतः या भागांमध्ये सहा तारखेपर्यंत सातत्याने अतिशय मुसळधार पाऊस असेल आणि वादळ देखील येईल. एव्हरेजच्यापेक्षा कितीतरी जास्त पाऊस होईल, अशा प्रकारची जी काही अलर्ट्स आहेत, ही अलर्ट्स आपण देत आहोत. त्या भागातल्या नागरिकांना देखील आपण सातत्याने दर तीन तासांनी एसएमएस देखील पाठवत आहोत आणि वेगवेगळ्या प्रकारचे अलर्ट्स देखील आपण देत आहोत.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आज अनेक ठिकाणी शाळांना आपण सुट्टी दिली आहे. लोकांना आपण विनंती केलेली आहे की, प्रवास टाळता (पान ८ वर)

## मंदिरात गैरव्यवहार नाना पटोलेंची टीका

मुंबई, दि.४- अयोध्येतील राम मंदिरनिर्मितीसाठी गोळा करण्यात आलेल्या देणग्यांमध्ये मोठा गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत, काँग्रेस नेते नाना पटोले यांनी भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर थेट आणि गंभीर आरोप केले आहेत. या घोटाळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदींसह आरएसएसचा समावेश असल्याची टीका नाना पटोले यांनी केली आहे.



राम मंदिराच्या देणगी घोटाळ्यावर बोलताना नाना पटोले यांनी थेट भाजप आणि संघाच्या वरिष्ठ नेत्यांवर निशाणा साधला. ते म्हणाले, या घोटाळ्याला थेट आरएसएस जबाबदार आहे. मोहन भागवतांपासून ते नरेंद्र मोदी आणि संपूर्ण (पान ८ वर)

## दोंडाईचामधील अमरावती नदीवरील आर्च पुल हेरिटेज पुला प्रमाणे दिसावा; ना.रावलांचे निर्देश



**दोंडाईचा, दि.४- शहराच्या मध्यभागातून वाहणाऱ्या अमरावती नदीवरील नवीन पुलाचे काम सध्या वेगाने सुरू असून, हा पूल नवीन व जुने दोंडाईचा शहराला जोडणारा महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. सुमारे ११० मीटर लांबीच्या या आर्च डिझाईन पुलाला आकर्षक व दिमाखदार स्वरूप देण्यासाठी हेरिटेज इलेवेशन देण्याच्या सूचना राज्याचे मंत्री ना. जयकुमार रावल यांनी आढावा बैठकीत दिल्या.**

नगराध्यक्षा नयनकुंवरताई रावल, माजी मंत्री हेमंत देशमुख, बांधकाम सभापती मुकेश देवरे, माजी नगराध्यक्ष डॉ. रविंद्र देशमुख, देवेंद्रसिंग परदेशी मुख्याधिकारी, शिवनंदन राजपूत (नगर अभियंता), शरद महाजन (आरोग्य निरीक्षक), विक्रांत बोरसे (आरोग्य निरीक्षक), राकेश पावरा (पाणीपुरवठा अभियंता), गौरव डी. शिंदे उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम, हेमंत गोसावी, (शाखा अभियंता), सुमित डी. राजपूत (शाखा अभियंता), संदीप चौधरी (शाखा अभियंता), एम. बी. वाघ ठेकेदार, पोलिस निरीक्षक दिनेश सोनवणे, (पान ८ वर)



## शुभांगी पाटील यांना कोणी विचारे ना! अखेर शिंदेंच्या सेनेमध्ये केला प्रवेश

**धुळे, दि.४- शिवसेना ठाकरे गटाला पुन्हा एकदा मोठा धक्का बसला आहे. ठाकरे गटाच्या उपनेत्या शुभांगी पाटील यांनी काल रात्री शिवसेना शिंदे गटात अधिकृत प्रवेश केला. उत्तर महाराष्ट्रातील हा पक्षप्रवेश राजकीय वर्तुळात मोठी चर्चा ठरत आहे. या सोहळ्यावेळी खासदार श्रीकांत शिंदे, खासदार नरेश म्हस्के, मंत्री प्रताप सरनाईक आणि मंत्री भरत गोगावले उपस्थित होते. उपस्थिांबाबतची माहिती स्वतः शुभांगी पाटील यांनीही दिली.**

पक्षप्रवेशानंतर प्रतिक्रिया देताना शुभांगी पाटील यांनी मोठं विधान केलं. त्या म्हणाल्या, पक्षातील कोणत्याही वरिष्ठाने मला थांब असं सांगितलं नाही. कोणाचाही फोन आला नाही. जवळपासच्या काही जणांनी कॉल केले त्यांची नाव मी थेट घेणार नाही मात्र त्यांनी (पान ८ वर)

## शहर पोलीसांनी दोघा सराईत चोरांना पकडले

धुळे, दि.४ - शहरासह वेगवेगळ्या ठिकाणाहून नऊ मोबाईल चोरणाऱ्या दोघा अट्टल चोरट्यांना शहर पोलिसांच्या डी बी पोलीस पथकाने पकडले. त्यांच्याकडून दीड लाखाचे मोबाईल जप्त केले.

शहरातील कैलास सुरेश कुसमुडे (वय २२, रा. सुरत बायपासरोड, चक्करबर्डी) त्याच्या आईला श्री भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे येथे दाखल केले. वॉर्ड क्र.३३ मध्ये झोपलेले असतांना चोरट्यांनी काल (ता.३) पहाटे चारच्या सुमारास कैलासच्या खिशातुन मोबाईल चोरी केला. याप्रकरणी धुळे शहर पोलीस ठाण्यात (पान ८ वर)



## पाणी जमीनीत मुरवा व जलसमृध्द व्हा फुराट कं.व बिल्डर्स असो.तर्फे सेमिनार

धुळे, दि.४- बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया धुळे शाखा तसेच फुराट कंपनीच्या सहकार्याने आयोजित रेन वॉटर हार्वेस्टिंग जनजागृती सेमिनार साक्री रोडवरील एका हॉटेल येथे नुकताच उत्साहात संपन्न झाला. पावसाचा प्रत्येक थेंब जमिनीत मुरवा धुळे जलसमृद्ध करा या संकल्पनेवर आधारित हा सेमिनार आयोजित करण्यात आला होता.

धुळे जिल्हा हा अल्प पर्जन्यमान व वारंवार भेडसावणाऱ्या (पान ८ वर)

## मंगळवार व बुधवार सर्व अंशतः अनुदानित शाळा बंद- प्रा.बच्छाव

**मुंबई, दि.४- महाराष्ट्रातील अंशतः अनुदानित शाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिक्षक समन्वय संघाने ७ व ८ जुलै २०२६ रोजी राज्यातील सर्व अंशतः अनुदानित शाळा बंद ठेवण्याचा निर्णय जाहीर केला आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील हजारो शाळांमधील अध्यापनाचे कामकाज दोन दिवस ठप्प ठेवून आझाद मैदानावर हजर रहावे.**

समन्वय संघाच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या अनुदानासह विविध मागण्यांबाबत शासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही ठोस निर्णय झालेला नाही. त्यामुळे राज्यातील शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी असून, अखेर शाळा बंद आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात आला आहे.

या आंदोलनात धुळे जिल्हासह महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतील अंशतः अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन शिक्षक समन्वय संघाच्या वतीने करण्यात (पान ८ वर)

## विमा कंपनीचा फसवणूक डाव उधळला; सहा जणांवर गुन्हा दाखल!

**धुळे, दि.४- दोन दुचाकींच्या समोरासमोर झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाल्यानंतर, दुचाकींचा विमा नसल्याने तब्बल ८० लाख रुपयांचा खोटा विमा दावा लाटण्यासाठी बनाव रचणाऱ्या सहा जणांविरोधात धुळे तालुका पोलीस ठाण्यात फसवणूक आणि कट कारस्थानाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आय.सी.आय.सी.आय. लोम्बार्ड विमा कंपनीच्या अधिकृत सल्लागाराने दिलेल्या तक्रारीवरून हा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे.**

याबाबत धुळे तालुका पोलीस ठाण्यात विमा कंपनीचे सल्लागार मुजम्मिल अर्शद शेख रा. छत्रपती संभाजीनगर यांनी दाखल फिर्यादीनुसार,८ डिसेंबर २०२० रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास मालेगाव-पारोळा रोडवरील धामणगाव फाट्याजवळ दोन मोटरसायकलींचा क्र.एमएच १८/ बीक्यू-८१३७ आणि एमएच१८/बीएल-१२९४ समोरासमोर भीषण अपघात झाला होता. यामध्ये संदीप पुंजूराम पाटील व कांतीलाल साहेबराव पाटील हे दोघे गंभीर जखमी झाले होते. उपचारादरम्यान संदीप पाटील यांचा मुंबईच्या जे.जे. रुग्णालयात मृत्यू झाला. अपघातानंतर जखमींना धुळे सिव्हील हॉस्पिटलमध्ये दाखल केले असता, त्यांच्या नातेवाईकांनी डॉक्टरांना दोन मोटरसायकलींच्या समोरासमोर झालेल्या धडकेत अपघात झाला अशी खरी माहिती दिली होती व तशी नोंदही झाली होती. मात्र, अपघातातील दोन्ही दुचाकींचा विमा उतरवलेला नसल्याने कोर्टातून कोणतीही आर्थिक भरपाई मिळणार नाही, हे नातेवाईकांच्या लक्षात आले. त्यामुळे मोठा आर्थिक फायदा लाटण्याच्या उद्देशाने मयताचे शालक, पत्की आणि इतर नातेवाईकांनी संगनमत करून एक कट रचला. त्यांनी दोन दिवसांनंतर पोलिसांत खोटी फिर्याद दिली की, एका अज्ञात वाहनाने (कारने) त्यांच्या दुचाकींना धडक दिली. तपासादरम्यान त्यांनी मयताचे शालक छोटू उत्तम पाटील (रा. सोनगीर) यांच्याच (पान ८ वर)



## हिरे वैद्यकीय महा.त सुविधांचा अभाव भिक मांगो आंदोलना काँग्रेसचा इशारा

**धुळे, दि.४- शहरातील भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालयातील रूग्णालयातील विविध विभागात सुविधांचा अभाव असल्याने रूग्णांची गैरसोय होते आहे. वारंवार निवेदन देवूनही दुर्लक्ष केले जात असल्याने काँग्रेस पक्षाच्यावतीने भिक मांगो आंदोलन करण्यात येईल. असा इशारा काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी निवेदनाद्वारे दिला.**

निवेदनात नमुद केले आहे की, हिरे वैद्यकीय महाविद्यालय सर्वोपचार रूग्णालयात नाक, कान, घसा विभागात मागील दीड वर्षांपासून (पान ८ वर)

## कलेक्टरकडून सखोल पुनरिक्षणाच्या कामाची पाहणी शहाद्याचा एकही पात्र मतदार वंचित ठेवू नये- निर्देश

**शहादा,दि.०४(का.प्र.) - भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार संपूर्ण जिल्ह्यात सध्या सखोल मतदार पुनरनिरीक्षण कार्यक्रम अत्यंत प्रभावीपणे राबविला जात आहे. या मोहिमेच्या पार्श्वभूमीवर शनिवारी जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांनी शहादा शहराला प्रत्यक्ष भेट देऊन सुरू असलेल्या एकूणच कामकाजाची सविस्तर पाहणी केली व प्रशासकीय यंत्रणेचा आढावा घेतला.**



या पाहणी दौऱ्यादरम्यान जिल्हाधिकारी डॉ .सेठी यांनी मतदार याद्यांचे अचूक सक्षमीकरण, नवीन मतदार पडताळणी, आवश्यक नोंदी, नवीन प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी, तसेच दुबार व मृत मतदारांची नावे वगळून मतदार यादी पूर्णतः अद्ययावत करण्याच्या सुरू असलेल्या प्रक्रियेची क्षेत्रीय पातळीवर प्रत्यक्ष माहिती घेतली. बीएलओ स्तरावर सुरू असलेल्या कामाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.या महत्त्वपूर्ण पाहणी प्रसंगी शहादा उपविभागाचे उपविभागीय अधिकारी दीपक गिरासे, शहाद्याचे तहसीलदार (पान ८ वर)



### शिरपूर येथील एकाला अटक

## गुंगीकारक कफसिरप औषधाचा बेकायदेशीर साठा एलसीबीकडुन जप्त

**धुळे, दि.४ - गुंगीकारक कफसिरप औषधांचा साठा विनापरवाना विक्रीच्या उद्देशाने बाळगणाऱ्यास शिंदखेडा येथे अटक केली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने कारवाई केली. संशयिताविरुद्ध शिंदखेडा पोलिसात गुन्हा दाखल झाला.**

पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी मानवी मेंदुवर विपरीत परिणाम घडवून आणणाऱ्या गुंगीकारक औषध (कफ सिरप) विनापरवानगी कब्जात बाळगणारे व विक्री करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाईचे निर्देश दिले. पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांनी शुक्रवारी (ता.३) मिळालेल्या माहितीनुसार संशयीत किरण वसंत सकट (रा. मच्छीबाजार, शिरपुर) याच्या कब्जात मानवी मेंदुवर विपरित परिणाम घडवुन आणणाऱ्या गुंगीकारक औषधांच्या बाटल्यांची साठा असल्याचे समजले. चोरटी विक्रीच्या उद्देशाने सुरत येथुन शिंदखेडामार्गे शिरपुर येथे जात असल्याची माहिती मिळाली. या कारवाईसाठी स्थानिक गुन्हे शाखा धुळे येथील पथक रवाना (पान २ वर)

## डी मार्ट जवळील तरुणाच्या लुटीतील एकास चाळीसगाव रोड पो.नी.पकडले

**धुळे, दि.४- शहरातील डी मार्ट जवळ तरुणाला मारहाण करून लुटल्या प्रकरणी चार जणांची टोळी चाळीसगाव रोड पोलिसांनी निष्पन्न केली. लुटलेला मुद्देमालासह गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल हस्तगत करण्यात आली असून चोवीस तासाच्या आत गुन्ह्याची उकल केली.**

शहरात शंभर फुटी रोड डीमार्ट जवळील पडक्या खोलीत तीन जणांनी शोएब शब्बीर शाह (वय ३२ ) रा.म्हसदी ता. साक्री जि. धुळे) यांना मारहाण केली. त्यांचे खिशातुन मोबाईल व चार हजारांची रोकड बळजबरीने काढुन घेतली. मोबाईल मधुन ओटीपी टाकुन ऑनलाईन नेने रुपये ट्रान्सफर करुन घेत. पसार



झाले. ३० जूनला मध्यरात्रीनंतर साडेबाराच्या सुमारास ही घटना घडली. याप्रकरणी चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात गुरुवारी (ता.२) जबरीचोरी व मारहाणीचा गुन्हा दाखल झाला.

चाळीसगावरोड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने तांत्रिक विश्लेषणाचे एक विधीसंघर्षग्रस्त (पान ८ वर)

## दुचाकीवरून पडलेल्या युवकाला मागुन येणाऱ्या वाहनाने चिरडले

**नंदुरबार, दि.४ (प्रतिनिधी)- दुचाकी घसरुन रस्त्यावर फेकला गेल्याने मागून आलेल्या अज्ञात वाहनाने चिरडल्यामुळे १९ वर्षीय युवकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना सावरट गावाजवळ घडली. यात युवकाच्या अपघाती निधनाची वार्ता कळताच बेडकी गावासह परिसरातून हळहळ व्यक्त करण्यात आली.**

नवापूर तालुक्यातील बेडकी येथील प्रतिक राजू गावित (वय १९) हा युवक दुचाकीने (क्र.एमएच ३९ एक्स एक्स ३८५२) धुळे सुरत महामार्गाने जात होता. परंतू सायंकाळी पाऊस झाल्याने रस्त्यावरुन जात असतांना त्याची दुचाकी घसरली. यावेळी रस्त्यावर फेकला गेल्याने भरधाव वेगात मागून आलेल्या अज्ञात वाहनाने जोरात धडक देत युवकाच्या अंगावरुन चाक जावून चिरडल्याने प्रतिक राजू गावित हा युवक जागीच ठार झाला. अपघातत घडताच वाहन चालक पसार झाला. घटनेची माहिती मिळताच (पान ८ वर)

## आग्रा येथील छापखान्यातून टिईटीची पेपर फुटला: तीन कर्मचाऱ्यांना अटक

**मुंबई, दि.४ - टीईटी पेपरफुटी प्रकरणी विशेष पोलीस पथकाने तीन जणांना अटक केली आहे. ज्या छापखान्यात ही प्रश्नपत्रिका छापली गेली होती त्याच कारखान्यातील हे तिघे कर्मचारी असून त्यांनीच मुख्य सुत्रधार विजेंद्र गुप्ता यास प्रश्नपत्रिका बाहेर काढून दिल्याचे निष्पन्न झाले आहे.**

मुंबई- नाशिक महामार्गालगतच्या भिवंडीतील डोंगराळ भागात कोनगाव पोलीस ठाण्याच्या पथकाने कारवाई करत टीईटी प्रश्नपत्रिकांच्या प्रती जप्त केल्या होत्या. याचे पडसाद राज्यभर उमटले होते. सरकारने यासाठी विशेष पोलीस तपास पथकाची स्थापना केली होती. आणि याप्रकरणाचा मुख्य सुत्रधार विजेंद्र गुप्ता याची पत्नी सुमनकुमारी गुप्ता, राजीव शाव, आकाश कुमार, धीरज सिंग, सोनू सिंह, मिथुन सिंह, कपिल दहिया अशा सातजणांना आतापर्यंत अटक करण्यात आली होती. मुख्य सुत्रधार विजेंद्र गुप्ता अद्याप फरार आहे.

शिक्षक पात्रता परीक्षेची प्रश्नपत्रिकांची छपाईचे कंत्राट माहिम पत्रण प्राव्हेट लिमिटेड कंपनीला देण्यात आले होते. या कंपनीचा छापखाना उत्तरप्रदेशातील आग्रा भागात आहे. येथूनच पेपरफुटल्याचा पोलिसांचा अंदाज होता आणि त्या दिशेने पोलिसांची पथके तपास करीत होती. याच तपासादरम्यान पथकाने नरेशकुमार पुरणचंद महोरे, संजयकुमार सुरेशचंद्र चंद्रा आणि बाबूलाल नारायणसिंह कुशवाहा या तिघांना अटक केली असून हे तिघे छापखान्यातील कामगार आहेत. यातील संजयला काही वर्षांपूर्वी कामावरून काढून टाकण्यात आले होत. तर, (पान २ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,34,200 रु.+3% GST
सोने- 24 K -1,46,500 रु.+3% GST
चांदी- 2,39,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## अवैध सागवानची वाहतुक रोखली लाकूड जप्त; अंधारात चालक पसार

**नंदुरबार, दि.४(प्रतिनिधी)- अक्राणी (धडगाव) तालुक्यातील बिलगाव प्रादेशिक वनक्षेत्रात वनविभागाच्या पथकाने कारवाई करत अवैधरित्या वाहतूक होणारा सागवान लाकडाचा साठा जप्त केला. कारवाईदरम्यान वाहनचालकाने वाहन न थांबविता वनकर्मचाऱ्यांवर वाहन घालण्याचा प्रयत्न केला. मात्र वनविभागाच्या पथकाने सुमारे दोन तास पाठलाग करून पिकअप वाहन ताब्यात घेतले. चालक अंधाराचा फायदा घेत पसार झाला.**

बिलगाव प्रादेशिक वनक्षेत्रातील माळ परिमंडळातील शेलदा-निमखेडी रस्त्यावर रात्री गस्तीदरम्यान ही कारवाई करण्यात आली. एम एच -०४ ए बी -४६५५ क्रमांकाच्या पिकअप वाहनातून विनापरवाना सागवान लाकडाची वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर वनविभागाने वाहनाचा पाठलाग केला. वाहनातून वरच्या भागात जळाऊ लाकूड तर खालच्या भागात सागवान लाकूड लपविण्यात आले होते. वनकर्मचाऱ्यांनी वाहन थांबविण्याचा प्रयत्न केला असता चालकाने (पान २ वर)

## बच्छाव मायलेकांची कृषी क्षेत्रामधील कामगिरी, सन्मान पत्र देऊन गौरव

**सोनगीर दि. ४(प्रतिनिधी)- कृषि क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी आणि नाविन्यपूर्ण प्रयोगांचा अवलंब करणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करण्यासाठी धुळे जिल्हा परिषदेच्या कृषि विभागामार्फत विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या जिल्हास्तरीय कृषिदिन कार्यक्रमात सोनगीर ता.जि. धुळे येथील महिला शेतकरी नवाबाई बच्छाव शिरसाठ व त्यांचा मुलगा ज्ञानेश्वर बच्छाव शिरसाठ यांना शेतकरी सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले.**



१ जुलै रोजी महाराष्ट्राचे हरितक्रांतीचे प्रणेते कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीचे औचित्य साधून या जिल्हास्तरीय कृषिदिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.श्रीमती नवाबाई शिरसाठ यांनी आपल्या शेती व्यवसायात पारंपरिक पद्धतींना फाटा देत आधुनिक कृषि तंत्रज्ञानाचा यशस्वी अवलंब केला आहे. शेती क्षेत्रातील विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून त्यांनी उत्पादकतेत वाढ केली असून, इतर शेतकऱ्यांसमोर एक नवा आदर्श ठेवला आहे. त्यांच्या याच उल्लेखनीय योगदानाची दखल धुळे जिल्हा परिषदेने घेतली आहे.

# मराठी विश्वकोश ज्ञानवर्धन स्पर्धेत वसंतराव नाईक विद्यालयाचे यश



**शहादा, दि.०४(का.प्र.) - महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई यांच्या वतीने ऑनलाइन पद्धतीने आयोजित करण्यात आलेल्या विश्वकोश ज्ञानवर्धन स्पर्धेमध्ये शहादा येथील वसंतराव नाईक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राज्य, जिल्हा आणि तालुका पातळीवर घवघवीत यश संपादन करून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.**

इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांसाठी या ऑनलाइन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. एक तासाच्या कालावधीत १००गुणांसाठी ५० बहुपर्यायी प्रश्न या परीक्षेत विचारण्यात आले होते. या कठीण परीक्षेत वसंतराव नाईक विद्यालयातील एकूण २१ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला होता.या स्पर्धेत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर आपली चिकाटी व गुणवत्ता सिद्ध केली. विद्यालयाचा विद्यार्थी अर्जुन कोळी याने संपूर्ण महाराष्ट्रात द्वितीय क्रमांक तर मेहुल बारी याने राज्यात चतुर्थ क्रमांक पटकावला आहे. या राज्यस्तरीय गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार राज्याचे मुख्यमंत्री माननीय देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आगामी काळात एका विशेष गौरव सोहळ्यात करण्यात येणार आहे. केवळ राज्यस्तरावरच नव्हे, तर जिल्हा आणि तालुका पातळीवरही विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पहिल्या तीन क्रमांकांवर आपले नाव कोरले आहे.जिल्हास्तरावर रोशन बोरसे (प्रथम ), रितिक जाधव (द्वितीय) आणि प्रशांत अहिरे (तृतीय) यांनी जिल्ह्यात प्राविण्य मिळविले. तालुकास्तरावर वैभव ईशी (प्रथम), रूपेश मराठे (द्वितीय) आणि अल्तमश मन्यार (तृतीय) यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.या सुयशाबद्दल विद्यालयात एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करून सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. संस्थेचे सचिव प्रा. संजय जाधव, सोनामाई शिक्षण प्रसारक मंडळाच्या सचिव सौ.वर्षा जाधव, संकुलाचे प्रशासकीय प्रमुख डॉ. हिमांशु जाधव, विद्यालयाचे प्राचार्य जे. एम. पाटील, उपप्राचार्य जे. बी. पवार, उपमुख्याध्यापक बोरसे एस. आर., पर्यवेक्षक खान ए. ए. व खेडकर ए. डी., तसेच केंद्र समन्वयक नेरकर पी. बी. यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना विश्वकोश ज्ञानवर्धन मंडळाकडून प्राप्त झालेली प्रशस्तीपत्रे, धनादेश व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले व त्यांच्या पुढील उज्ज्वल वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि उपस्थितांचे आभार प्रदर्शन व्ही. एस. पावरा यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाच्या सांस्कृतिक समितीच्या सर्व सदस्यांनी व शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# बामखेड्यातील आरोग्य उपकेंद्रात क्षयरोग शोध,निदान शिबिर संपन्न

**शहादा,दि.४(प्रतिनिधी)- जिल्हा क्षयरोग केंद्र नंदुरबार आणि जिल्हा आरोग्य विभागाच्यावतीने टीबीमुक्त भारत २०२६ यासंकल्पनेअंतर्गत शहादा तालुक्यातील बामखेडा येथील आरोग्य उपकेंद्र येथे विशेष क्षयरोग (टीबी) शोध व निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.**

या शिबिरात तब्बल १२३ नागरिकांची डिजिटल एक्स-रेद्वारे मोफत तपासणी करण्यात आली. हा उपक्रम जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रवींद्र सोनवणे आणि जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.महेंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेंद्र वळवी व प्राथमिक आरोग्य केंद्र वडाळीचे डॉ.नारायण बावा यांच्या सहकार्याने राबविण्यात आला.



टीबीमुक्त भारत २०२६ या उद्दिष्टपूर्तीसाठी आरोग्य विभागाकडून गावोगावी व पाड्यापाड्यांमध्ये जाऊन नागरिकांचे मोफत एक्स-रेद्वारे टीबी तपासणी अभियान राबविण्यात येत आहे. निदान झालेल्या रुग्णांना तात्काळ उपचार सुरू करून त्यांना पूर्णपणे बरे करण्यावर भर दिला जात आहे. एका टीबी रुग्णामुळे १५ ते २० जणांना संसर्ग होण्याची शक्यता असल्याने वेळेवर निदान आणि उपचार अत्यंत महत्त्वाचे असल्याचे आरोग्य विभागाने स्पष्ट केले. या मोहिमेच्या यशासाठी जनसहभाग अत्यंत आवश्यक असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

यावेळी समुदाय आरोग्य अधिकारी डॉ विजय पावरा, एएनएम पाठक, एमपीडब्ल्यू अरविंद गायवडे, एसटीएस संजय निकुंभे, वैभव नंदेश्वर, जीएनएम मयुरी गवळे, अनिता शिरसाठ, संजय राठोड, आशा वर्कर रंजना गवळे, जया ईशी, शोभा गवळे उपस्थित होते.

पान १ वरुन

## गुंगीकारक कफसिरप औषधाचा

केले. शिंदखेडा येथील कुमरेज फाट्याजवळ सापळा लावला. किरण सकट यास थांबवून त्याच्याकडील दोन बॅगची तपासणी केली. त्यात मानवी मेंदुवर विपरीत परिणाम घडवुन आणणारे गुंगीकारक औषध कफ सिरपच्या बाटल्या मिळाल्या. विनापरवाना विक्रीच्या उद्देशाने बाळगल्याचे चौकशीत निष्पन्न झाले. पोलिसांनी अठरा हजार चारशे रुपयांच्या १६० सीलबंद बाटल्या जप्त केल्या. शिंदखेडा पोलीस ठाण्यात संशयित किरण सकट याच्याविरुद्ध गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम, औषधी द्रव्य व सौंदर्य प्रसाधन अधिनियम कलम अन्वये गुन्हा दाखल झाला. पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे, सहाय्यक निरीक्षक दीपक ढोके, हवालदार प्रशांत चौधरी, चेतन बोरसे, संतोष हिरे, कमलेश सुर्यवंशी यांनी केली.

## अवैध सागवानची वाहतुक रोखली

वेग वाढवून पळ काढला. सुमारे १५ ते २० किलोमीटर पाठलाग केल्यानंतर पानबारी गावाजवळ वाहन पकडण्यात आले. मात्र चालक वाहन सोडून फरार झाला. जप्त वाहन व मुद्देमाल धडगाव टिंबर आगारात जमा करण्यात आला आहे. याप्रकरणी वनरक्षक मंगेश वळवी यांच्या फिर्यादीवरून वनगुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई वनसंरक्षक निनू सोमराज, उपवनसंरक्षक संतोष सस्ते, विभागीय वनाधिकारी राजेंद्र सदगीर यांच्या मार्गदर्शनाखाली बिलगावचे वनक्षेत्रपाल लक्ष्मीकांत शेंडगे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पुढील तपास वनपाल प्रियांका निकुंभे करीत आहेत.

## आग्रा येथील छापखान्यातून टिईटीची

नरेशकुमार आणि बाबूलाल हे मात्र कंपनीत कार्यरत होते. या तिघांनी छापखान्यातून प्रश्नपत्रिका काढून विजेंद्रला प्रशपत्रिका दिल्याची बाब तपासात समोर आली आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. या तिघांच्या अटकेमुळे आरोपींचा संख्या दहा इतकी झाली आहे.

## थाळनेर येथे तरूणाला मारहाण

शिरपूर दि.४ (का.प्र.) : तालुक्यतील थाळनेर गावात अजय विनायक कोळी (वय २३, रा.थाळनेर) याला संशयित सचिन नागो कोळी (रा.थाळनेर) याने लोखंडी कड्याने मारहाण केल्याची घटना दोन जुलैला सायंकाळी साडेसहाला घडली. मोठ्या भावाला मारहाण केल्याचा जाब विचारल्याने ही मारहाण झाल्याचे कळते. हवालदार भूषण चौधरी तपास करीत आहेत.

आपला महाराष्ट्र
वाचकांना विनम्र सुचना
आपला महाराष्ट्र वृत्त पत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहीरातीतील मजकुरायी शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबधी आर्थिक व्यवहार करावा जाहीरातीतील आपल्या उत्पन्नाच्या संदर्भात अथवा सेवेच्या संदर्भात जाहीरातदार जे दावे करतात त्याची आपला महाराष्ट्र वृत्तपत्र समुह कोणतीही हमी घेत नाहीत जाहीरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहीरातदारांकडून न झाल्यास होणाऱ्या परिणामास आपला महाराष्ट्र वृत्तपत्र समुहाचे मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक जबाबदार रहाणार नाहीत कृपया वाचकांनी यांची नोंद घ्यावी.

## प्रकाश में आज




धर्मेन्द्र, रिना रॉय, विनोद खन्ना, नरेंद्रनाथ, अरुणा ईराणी, अमजद खान

# मस्तिष्क आजार तपासणी शिबीरामध्ये मार्गदर्शन व बालरुग्णांची तपासणी



**धुळे, दि.४ - कस्तुरबा हॉस्पिटल धुळे ( समर्पण मल्टी डिसॅबिलिटी रिहॅब सेंटर) येथे मा मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिर अंतर्गत जिल्हा स्तरावरील आकडी व मस्तिष्क आजार तपासणी शिबीराचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. त्यात आयोजक संस्था म्हणून मातृसेवा संघ धुळे, रोटरी क्लब ऑफ धुळे, रोटरी क्लब ऑफ धुळे चॅरिटेबल ट्रस्ट, रोटरॅक्ट क्लब ऑफ धुळे, कमल उदवाडिया फाउंडेशन व समर्पण मल्टी डिसॅबिलिटी रिहॅब सेंटर यांचा महत्त्वाचा सहभाग होता. या शिबिराची काही ठळक वैशिष्ट्येः-**

दोन दिवसीय जिल्हास्तरीय विशेष वैद्यकीय तपासणी व मार्गदर्शन शिबिरात विशेष गरज असलेल्या ते वर्षे वयोगटातील बालरुग्णांची मोफत तपासणी करून उपचार करण्यात आले. यात ऑटिझम, सेरेब्रल पाल्सी, फिट्स (आकडी), बौद्धिक दिव्यांगत्व व इतर न्यूरोलॉजिकल विकार असलेल्या बीपीएल विद्यार्थ्यांची मोफत तपासणी नामांकित बाल न्यूरोलॉजिस्ट व बहुविद्याशाखीय तज्ज्ञांकडून निदान, उपचार मार्गदर्शन, मोफत औषधे व आवश्यक तपासण्यांची सुविधा करून देण्यात आली होती.

धुळे शहर, धुळे ग्रामीण, साक्री, शिरपूर, शिंदखेडा तसेच महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला.स्पीच थेरपी, मानसोपचार, ई ई जी, व इतर पुनर्वसन तज्ज्ञांचे आयोजनात तांत्रिक सहकार्य लाभले. या उपक्रमासाठी समर्पण सेवाभावी संस्थेचे संचालक राजेश भतवाल, विजय चांडक, प्रदीप शहा, महेश कुलकर्णी, आशिष अग्रवाल, महेश मालपाणी, तसेच रोटरी क्लबचे अध्यक्ष विलास कोठावदे, सचिव समीर भालकर, रोटरी ट्रस्टचे अध्यक्ष शांतिलाल जैन, सचिव राजेश वाणी, कोषाध्यक्ष राजेश अग्रवाल, कुंतल अग्रवाल, विरम शहा, अशोक अग्रवाल आणि जिल्हा समन्वयक सचिन पिंगळे यांनी मोलाचे सहकार्य केले.जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी मनीष पवार, सहायक कार्यक्रम अधिकारी डॉ. सिद्धार्थ नगराळे यांच्या मार्गदर्शनाखाली गटशिक्षणाधिकारी प्रमोद सोनार (धुळे), विठ्ठल घोगे (शिरपूर), दीपक सोनवणे (शिंदखेडा) व राजेंद्र पगारे (साक्री) यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

डॉ. अनैता हेगडे उदवाडिया यांच्या नेतृत्वाखाली तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमने शिबिर यशस्वी केले.

सौ. कल्पना शहा यांनी शिबिराच्या नियोजन, समन्वय व व्यवस्थापनामध्ये मोलाचे योगदान देऊन उपक्रमाच्या यशात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

# वडगावला खरीप हंगामांतर्गत कापूस व तूर बियाणे वितरण

**शहादा,दि.४ (प्रतिनिधी)- तालुक्यातील वडगाव येथे केंद्र पुरस्कृत एकात्मिक कापूस विकास कार्यक्रमांतर्गत खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर कापूस व तूर बियाणे वाटप कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमामध्ये ऑनलाईन पद्धतीने प्रात्यक्षिकासाठी निवड झालेल्या शेतकरी गटांना मान्यवरांच्या हस्ते बियाण्यांचे मोफत वाटप करण्यात आले.**

याप्रसंगी उपस्थित सहाय्यक कृषी अधिकारी सुनील सुळे यांनी शेतकऱ्यांना सघन कापूस पीक लागवड तंत्रज्ञानाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. आधुनिक पद्धतीने कापूस लागवड करून उत्पादन कसे वाढवावे, सघन कापूस लागवड पद्धत पारंपारिक पद्धतीपेक्षा या पद्धतीत प्रति एकर झाडांची संख्या जास्त ठेवून कमी कालावधीत अधिक उत्पादन घेण्यावर भर दिला जातो. सघन लागवडीसाठी कमी पसरणारे, सरळ वाढणारे आणि कमी कालावधीत उत्पादन देतो.

तसेच बदलत्या हवामानामुळे व यंदाचे अल निनोमुळे शेतकऱ्यानी बीबीएफ द्रावरे पेरणी करणे, उताराला आडवी पेरणी करणे, जमिन आरोग्य पत्रिका अंतर्गत माती परिक्षण करणे, मातीच्या आरोग्यासाठी संतुलित खत व्यावस्थापन, जिवाणू खताचा वापर, हिरवळीची खते आणि पिक पध्दतीतील बदल करुन ठिंबक सिंचनाचा वापर करणे तसेच अधुनिक व तंत्रज्ञान शेतीसाठी महाविस्तार एआय चा अवलंब करणे, वनपट्टाधरक शेतकऱ्यानी फॉर्मर आयडी तयार करणे, पिएम किसान ईकेवासी आधार सेंडिंग करणे, शेतीला जोडधंदा म्हणुन प्रधानमंत्री कृषि सुक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेचे लाभ घेण्याचे आव्हान केले. या कार्यक्रमाला परिसरातील प्रमुख लोकप्रतिनिधी सरपंच दिनेश पावरा, उपसरपंच विजय सोनवणे, प्रकाश नावडे, रमेश पटले, राजेंद्र मोते, देवसिंग पावरा, ग्रामपंचायत सदस्य गुमान पावरा, दिवान सुळे, अजित वळवी, उदेसिंग पटले यांच्यासह वडगाव गावातील शेतकरी गटातील सर्व लाभार्थी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच मिळालेल्या या दर्जेदार बियाण्यांमुळे आणि कृषी विभागाच्या मार्गदर्शनामुळे यंदा उत्पन्नात चांगली वाढ होईल, असा विश्वास उपस्थित लाभार्थी शेतकऱ्यांनी व्यक्त केला. गावामध्ये मृद आरोग्य संवर्धन, मृद परिक्षण आणी शाश्वत शेती पध्दतीचा अवलंब प्रसार करण्याचा संकल्प केला.

## पी.एम.प्रणाम सहकार सह.प्रशिक्षण कार्यक्रम

नंदुरबार, दि.४ (प्रतिनिधी)- नंदुरबार येथे पी एम प्रणाम सहकार प्रशिक्षण कार्यक्रम कृभको या भारत सरकारच्या सहकार खात्या अंतर्गत येणाऱ्या संस्थेकडून घेण्यात आला या वेळी जिल्ह्यातील विविध सहकारी संस्था त्यांचे पदाधिकारी सदस्य व वितरक उपस्थित राहून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शहादा खरेदीविक्री संस्थांचे व्यवस्थापक अनिलभाई पटेल होते तसेच कृभको चे राज्य विपणन व्यवस्थापक जितेंद्र भामरे विभागीय व्यवस्थापक रंजीत पाटील वरिष्ठ क्षेत्र अधिकारी संदीप ढाकणे एम ए आय डी सी चे प्रादेशिक व्यवस्थापक सुनील इंगळे , विदर्भ कॉपरेटिव्ह चे व्यवस्थापक अनिल पवार , आणी नंदुरबार असोसिएशन अध्यक्ष कन्हय्यालाल पाटील यांची उपस्थिती लाभली या वेळी कृभको च्या विविध सामाजिक योजना आणि उत्पादनाची माहिती देण्यात आली संतुलित खतांचा वापर पीक उत्पादन वाढ आणि शेतकऱ्यांची व सहकारीसंथांची आर्थिक परिस्थिती मजबूत करण्यासाठी कृभको च्या योजनांचे मार्गदर्शन श्री जितेंद्र भामरे यांनी केले व लाभ घेण्याचे आव्हाहन केले . श्री रंजीत पाटील विभागीय व्यवस्थापक यांनी भारतभरामध्ये सहकारी सप्ताहाचे आयजन दिनांक २९ जून ते ६ जुलै २०२६ या कालावधी मध्ये भारत सरकार आणी त्याअंतर्गत येणाऱ्या कृभको कडून भारतभर विविध कार्यक्रमांतर्गत करण्यात येत आहे असे सांगितले वरिष्ठ क्षेत्र अधिकारी संदीप ढाकणे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून कार्यक्रमाचे उद्दिष्ट्य स्पस्ट केले त्यांनी सहकारीसंथा बळकटीकरणासाठी अश्या उपक्रम महत्वाचे असल्याचे अधोरेखित केले.

# अवजड वाहनांसाठी उंची-प्रतिबंधक कमान उभारा- नगरसेविका पवार

**शहादा,दि.०४(का.प्र.)- शहादा नगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १४ मधील जैन प्लाझा ते साईबाबा नगर या अंतर्गत रस्त्यावर वाढलेल्या अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. या मार्गावर तातडीने लोखंडी उंची-प्रतिबंधक कमान उभारण्यात यावी, अशी आग्रही मागणी प्रभागाच्या नगरसेविका सौ. ममता हेमराज पवार यांनी शहादा नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.**

गुरूवारी झालेल्या सर्वसाधारण सभेतील ऐनवेळी घेण्यात आलेल्या विषयावर मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात नगरसेविका ममता पवार यांनी म्हटले आहे की, प्रभाग क्र. १४ मधील जैन प्लाझा ते साईबाबा नगर या रस्त्यावरून सध्या मोठ्या प्रमाणावर अवजड वाहनांची बेकायदेशीर आणि धोकादायक पद्धतीने ये-जा सुरू आहे. हा रस्ता निवासी भागात येत असून या ठिकाणी विविध खासगी शिकवणी क्लासेस आहेत. त्यामुळे लहान मुले, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांचा या मार्गावर दिवसभर सतत वावर असतो.अवजड वाहनांच्या अतिवेग आणि गर्दीमुळे यापूर्वी या परिसरात लहान-मोठे अपघात घडले आहेत. सुदैवाने यात कोणतीही मोठी जीवितहानी झाली नसली, तरी भविष्यात येथे एखादी मोठी दुर्घटना घडण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. परिसरातील नागरिकांमध्येही यामुळे कमालीचे भीतीचे वातावरण आहे.या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी जैन प्लाझा आणि साईबाबा नगरच्या शेवटच्या टोकाला, जेथून बायपास नॅशनल हायवेकडे रस्ता जातो, त्या ठिकाणी लोखंडी उंची-प्रतिबंधक कमान उभारणे अत्यंत गरजेचे आहे. ही कमान उभारल्यास अवजड वाहनांना या अंतर्गत रस्त्यावर प्रवेश करता येणार नाही आणि पर्यायाने नागरिकांची व विद्यार्थ्यांची सुरक्षितता सुनिश्चित होईल.सदर समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन शहादा नगरपालिकेने या मागणीवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा आणि प्रभाग १४ मधील नागरिकांच्या सुरक्षेसाठी तात्काळ आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी नम्र विनंती नगरसेविका सौ. ममता हेमराज पवार यांनी प्रशासनाकडे केली आहे. या मागणीमुळे प्रभाग क्र. १४ मधील रहिवाशांमधून समाधान व्यक्त केले जात असून, पालिका प्रशासन यावर काय पावले उचलते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# डॉ. ईशान नेरकर यांचा पेशंटचा ट्रॅक.... नवी संकल्पना यशस्वी

**साक्री, दि.४(प्रतिनिधी)- १ जुलै डॉक्टर्स डे निमित्ताने नाशिक येथे पेशंटचा ट्रेक ही नवी संकल्पना महाराष्ट्रात पहिल्यांदाच राबवण्यात आली.**

आपणा सर्वांसाठी डॉक्टर म्हणजे देवदूतच. ह्याच रुपात आजारपणात आपल्यासाठी देवासारखा धावून येणारा, जीवनदान देणारा, प्रयतकांची पराकाष्ठा करुन आपल्याला नवं आयुष्य जगण्यासाठी उमेद वाढवणारा देवमाणूस म्हणजे डॉक्टर. वैद्यकीय सेवेशिवाय आणखी बरेच काही करण्याची त्याची प्रवृत्ती आपल्याला लाजवेल अशीही असते. कधी कधी मोफत तपासणी शिबीर, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांची सेवा, ग्रामीण भागातील पेशंटसाठी विशेष सोयी आणि तत्सम जे जमेल ते करण्याचा जणू विडाच उचललेला असतो.

पण आज पहिल्यांदाच पेशंटचा ट्रेक ही नवी संकल्पना महाराष्ट्रात पहिल्यांदाच राबवण्यात आली. नाशिकच्या न्युरोसर्जन असलेल्या डॉ. ईशान नेरकर ह्यानी आजपर्यंत अनेक ब्रेन सर्जरी केल्या. त्या उत्कुष्ठपणे यशस्वीपण झाल्या. मणक्यांच्यापण खुप क्लिष्ट अशा सर्जरी करुन त्यांनी अनेकांना आपलं हरवलेलं जगणं सहजपणे जगण्याची नवी स्वप्नं दाखवली आणि सत्यात उतरवली देखील. त्यांच्या ह्या कामगिरीबद्दल त्यांचा गौरवही झाला. वैद्यकीय क्षेत्रात मानाचा तुराही रोवला गेला. पण त्यानी ही जी पेशंटचा ट्रेक नवी संकल्पना राबवली. त्यामुळे अनेकांच्या मनात आजारपणातील अपयश पचवून स्वस्थ आयुष्याची प्रत्येक पायरी सावधपणे आणि धैर्याने चढण्याची नवी ऊर्जा मिळाली.

३ वर्षाच्या छोट्या पेशंटपासून ते ८५ वर्षांच्या आजी आजोबांपर्यंत सगळेच आज खुप खुश दिसत होते. आपण सर्जरीनंतर असं काही करु शकू ह्याची पुसटशीही कल्पना नसेल अगोदर त्यांच्या मनात डॉक्टर ईशान सरांनी जणू त्यांचं न पाहिलेलं स्वप्न पूर्ण केलं असं त्या प्रत्येक पेशंटचा चेहरा बोलत होता. त्या डोळ्यांमधे जी भावना वाचायला मिळाली ती डॉक्टरांच्या व्यक्तिमत्त्वातील प्रत्येक पैलू उलगडतेय असं भासत होतं. आजारपणातून बरं झाल्यानंतरही नसेल जाणवला एव्हढा उत्साह त्यांच्यात आज जाणवत होता. आज त्या सगळ्यांच्या डोळ्यातला आत्मविश्वास पाहून अशा देवदूताची किती आवश्यकता आहे आपल्या जीवनप्रवासात असं कदाचित त्याना वाटत असणार. अशा वेळेस नक्कीच आपला डॉक्टरांच्या प्रति असलेला ठाम विश्वास आणि त्यांचं आपल्या प्रति असलेलं प्रेम,त्यांची कामावरची निष्ठा आणि आपली त्यांच्याविषयीची भावनिक निष्ठा हे सगळंच महत्त्वपूर्ण असतं.

ट्रेकला जाण्या आधी किंवा चढत असताना सतत सोबत राहून गप्पा मारत, उत्साह वाढवण्यासाठी जमेल ते प्रयोग करत असे उपक्रम पूर्णत्वास नेणं तसं जबाबदारीचं काम होतं. अशाच नवनव्या उपक्रमांमधून स्वस्थ आयुष्य जगण्याची नवी प्रेरणा देण्यात डॉ. ईशान यश मिळाले.

## शब्दकोडे क्रमांक : २४०४


| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ३ | ■ | ४ | ५ | | ■ | ६ | ७ |
| | ■ | | ■ | ८ | ९ | | | ■ | १० | ■ | |
| ११ | १२ | ■ | १३ | | | ■ | १४ | १५ | ■ | १६ | ■ |
| ■ | १७ | | | ■ | १८ | १९ | ■ | २० | | | |
| २१ | | ■ | २२ | २३ | ■ | २४ | २५ | | ■ | | ■ |
| २६ | | २७ | ■ | २८ | | ■ | | ■ | २९ | ■ | ३० |
| | ■ | ३१ | ३२ | | ■ | ३३ | ■ | ३४ | | ३५ | |
| ■ | ३६ | | | ■ | ३७ | | ३८ | ■ | ३९ | | ■ |
| ४० | | ■ | ४१ | ४२ | | ■ | ४३ | ४४ | ■ | ४५ | ४६ |
| | ■ | ४७ | ■ | ४८ | | | ■ | ४९ | | ■ | |
| ■ | ५० | | ५१ | ■ | | ■ | ५२ | | ■ | ५३ | ■ |
| ५४ | | ■ | ५५ | | ■ | ५६ | | ■ | ५७ | | |


**आडवे शब्द :** १.एक जगप्रसिद्ध मराठी लिपी ४.दंगा ६.अमेरिकेची अवकाश संशोधन संस्था ८.संस्मरणीय १०.संगीत सप्तकातील तिसरे स्वर ११.लमाणांचा तांडा १३.जखमेवर लावावया स्निग्ध औषध १४.तग १७.निर्मिती १८.एक हजार किलो २०.बेईमान २१.दुधापासून बनवतात ते पाचक पेय २२.एक मुस्लिम सण २४.वांग्यापासून बनवतात २६.नाश २८.विषम-विरुद्ध ३१.मल,केर ३४.लायसन्स ३६.शेंगेतील वाटाणे ३७.चिंतन ३९.मानेखालील शरीर ४०.हत्या ४१.तुटलेल्या मडक्याचा तुकडा ४३.तंटा ४५.भेट ४८.नभ ४९.नंतर ५०.'शीव',मुंबईच्या मध्यरेल्वेतील एक स्थानक ५२.सेवक ५४.मार्ग ५५.रद्द ५६.हाडूक ५७.प्रियकर **उभे शब्द :** १.मिथुन चक्रवर्थीचा एक सिनेमा २.नस,धमनी ३.आखाती देशातील एक चलन ४.टोळीयुद्ध ५.नड ७.एक टिकाऊ लाकूड ९.कोरडे-विरुद्ध १२.दुरावा १३.मज्जाव १५.सहाय्य १६.एकाद्या गोष्टीची कमतरता १९.गगन २१.चटकन रागावणारा २३.विजया दशमी २५.रिकामा २७.चपट नाकाचा २९.शिकार ३०.दुरावस्था ३२.उसाचा रस काढण्याचे यंत्र ३३.दोन नंतर येणारी संख्या ३५.मोठ्या आकाराची वाटी ३६.मधुकर ३७.उदासी ३८.नूतन ४०.उमर ४२.पाय ४४. वापी जवळील एक केंद्रशासित प्रदेश 'दीव *** ' ४६.चोर ४७.आंब्याची बाट ५०.सोबत ५२.किल्ला ५३.गुपित

### शब्दकोडे क्रमांक : २४०३ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| य | कृ | त | ■ | चो | वी | स | ■ | क | पि | ल | ■ |
| म | ती | ■ | सं | प | ■ | ह | मी | ■ | च | ■ | र |
| रा | ■ | ता | ग | ■ | ना | का | ■ | अ | का | र | ण |
| ज | हा | ल | ■ | बा | ■ | र | ह | दा | री | ■ | गा |
| ■ | नी | ■ | आ | बा | ळ | ■ | द | ल | ■ | ब | डा |
| चि | ■ | सा | ■ | आ | ■ | नो | ■ | त | ल | म | ■ |
| व | ज | ■ | सा | म | ना | ■ | की | ■ | ल | ■ | ना |
| डा | व | रा | ■ | टे | री | फ | ■ | मु | का | द | म |
| ■ | ळ | ■ | आ | ■ | द | ■ | श | ब | री | ■ | दा |
| फि | ■ | शा | स | क | ■ | क | त | ल | ■ | श | र |
| र | शी | ■ | मा | ■ | वा | सा | ■ | क | ह | र | ■ |
| ता | ■ | मा | न | व | ■ | रा | य | ■ | म | द | र |






# विश्वातील महान राजे



प्रा.डॉ.मधुकर जाधव
मो.९९७५५४६०२०

छत्रपती शिवाजी महाराजांचे दैदिप्यमान कार्य अंखड प्रेरणादायी आहे. छत्रपतींनी गतिहीन बनलेल्या समाजाला स्वराज्याच्या उच्च ध्येयाने जागृत करून त्यांच्या स्वाभिमानाला चेतना देण्याचे महान कार्य केले. ही जगाच्या इतिहासातील थक्क करणारी घटना होय. ध्येय ठरवूच संकटावर तुटून पडण्याची ताकद त्यांनी उभा केली. वैशिष्टयपूर्ण ध्येयाचा स्विकार करून अंतिम उद्दिष्टय गाढणारे हे त्यांचे कार्य श्रेष्ठ आहे. जन्माला आलेला प्रत्येक माणूस श्रेष्ठ आहे. आगदी सामन्यांतला सामान्य माणूसही कर्तुत्व गाजवू शकतो, इतिहास निर्माण करू शकतो हा ध्येयवाद पक्का रूजविला. त्यासाठी अफाट मेहनत आणि परिश्रम घेतले. छत्रपती हे नव्या युगाचे निर्माते होत. त्यांनी संबंध मराठी मुलुख एकत्र केला. सर्व जाती-धर्मातील लोकांची मोट बांधुन स्वराज्य उभे केले. अगदी मरणाच्या तोंडावर उभे राहुन लढणारी माणसे निर्माण केली.

'आपण सर्व समान'हे ब्रीदवाक्य डोळयासमोर ठेऊन छत्रपतींनी स्वराज्याची मुहुर्तमेढ रोवली. स्वराज्याच्या प्रत्येक मावळ्यामध्ये ध्येयवाद पेरला. त्यामुळे लाखो संकटे आले तरी ही मावळा आपल्या ध्येयापासुन विचलीत झाला नाही, कि स्वराज्यकार्यापासुन विभक्त झाला नाही किंवा बिधरला व घाबरला नाही.निष्ठेने शुर मावळे पुढे आले. छत्रपतींनी इ.स.१६४२ साली स्वराज्य स्थापन करण्याचे ध्येय निश्चित केले. डोंगर, पर्वत व दऱ्या खोऱ्यातील मावळ्यांना संघटीत केले.कोणत्याही परिस्थितीत ध्येयापासुन विचलीत न होण्याचा छत्रपतींचा गुण सर्वश्रेष्ठ आहे. शून्यातुन स्वराज्य निर्माण करीत असताना छत्रपतींना अनंत अडचणी आल्या परंतु राजे त्यापासुन किंचीत ही ढळले नाहीत हेच त्यांच्या ध्येयवादी यशाचे गणित होते. अनेक वर्षे दबलेल्या गोर-गरीबरयतेसाठी स्वराज्य निर्माण करणे हे महाराजांचे ध्येय होते.त्यासाठी शेतात नांगर धरणारांच्या हातात तलवारी दिल्या.त्यांच्या मनामध्ये स्वाभिमानाचे बीज पक्के

## आदर्श ध्येयवाद



रूजवले.त्यांच्या ध्येयवादी व धैर्यवादी धाडसामुळे आणि प्राणांची पर्वानकेलेल्या पराक्रमामुळे स्वराज्य उभे राहिले.अचूक माणसाची पारख करून त्यांच्या मध्ये स्वराज्य स्थापनेचे बीज पेरले. ते इतके रूजविले की सर्वांना स्वराज्य आपले आहे व छत्रपती हे आपले दैवत आहेत असे वाटू लागले. सामान्य माणसामध्ये महाराजांनी ध्येयवाद इतका पक्का रूजविला की देशातील सर्व जाती-धर्माची माणसे त्यांच्या भोवती एकत्र आली. त्यांच्यामध्ये आदर्शाचा वनैतिकतेचा वस्तुपाठ निर्माण केला.

स्वराज्यातील प्रत्येक मावळा ध्येयाने प्रेरीत होऊन स्वातंत्र्यासाठी लढत होता. या उलट निजामशाही, मोगल व आदिलशाहीचे सरदार व सैनिकांपुढे कोणत्याही प्रकारचे ध्येय नव्हते. त्यांच्या निष्ठा भाडोत्री होत्या. स्वराज्यातील मावळे स्वराज्यासाठी व स्वातंत्र्यासाठी लढले तर परकीय सैनिक पगारासाठी लढले. या फरकातुनच स्वराज्य विस्तारीत गेले व इतर सत्तानष्ट होत गेल्या. छत्रपती शिवाजी महाराजांनी जसा माणसांचा अभ्यास केला तसाच सहयाद्रितील दगड-धोंड्यांचा व कड्याकपारीचाही अभ्यास केला. डोगर-द-यांच्या गराड्यात छत्रपतींनी शत्रूपक्षावर विजय मिळविले.

छत्रपती शिवाजी महाराज तत्वाच्या आणि ध्येयाच्या दृष्टीने जगाच्या इतिहासात सर्वश्रेष्ठ ठरले. स्वकीयांना एका झेंड्याखाली एकत्र आणून त्यांच्यामध्ये समानता, राष्ट्रवाद वदेशभक्ती निर्माण करून स्वराज्याची निर्मिती केली. एक त्यागी पिढी आपल्या प्राणाची पर्वा नकरता छत्रपतींच्या नेतृत्वखाली एकत्र आली. लोकांमध्ये विश्वासाची भावना निर्माण करून त्यांना स्वराज्याच्या कार्यात जोडून घेतले. निष्ठावंत मावळ्यांच्या त्यागातुन स्वराज्याची कमान नेहमी वाढत गेली.

माणसाची पारख करण्याची विलक्षण शक्ती छत्रपतींकडे होती. सामान्य माणूस असला तरी त्यामध्ये असामान्य गुण शोधून त्यांचा स्वराज्याकरीता उपयोग करून घेतला. स्वराज्यासाठी प्राणाची आहुती देण्यास असे शूर-वीर महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यात निर्माण झाले. स्वराज्यावर अनेक संकटे आली परंतु सर्व सामान्य रयत सर्व सामर्थ्यानीशी त्यांच्या पाठीमागे उभी राहिली. छत्रपतीवर निष्ठा ठेवणाऱ्या प्रजेने हाती शस्त्र घेऊन स्वराज्याच्या रक्षणार्थ प्राणाची बाजी लावली.लष्करी सैन्याबरोबर सर्व सामान्य जनतेनेही शस्त्र हाती घेऊन शत्रूला पराभूत केले. स्वराज्य हे सर्व सामान्य रयतेचे ध्येय बनले.

छत्रपतींनी स्थापन केलेल्या स्वराज्याला राष्ट्रीय ध्येय होते. रामचंद्रपंत आमात्य यांनी आपल्या आज्ञापत्रात जाहिर केले आहे ते असे की 'लोकांचे रक्षण करणे, सार्वजनिक हिताची कामे हाती घेणे, कायद्याप्रमाणे न्यायनिवाडा करणे, देशाच्या रक्षणाकरीता लष्करी, मुलकी सेवा संघटित करणे व सामान्यपणे जनतेच्या कल्याणाचे संवर्धन करणे ही स्वराज्याची कर्तव्ये होती हे ध्येय समोर ठेऊन छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व सामान्य जनतेचे स्वराज्य उभे केले'.आपल्या मातृभूमीला स्वातंत्र्य प्राप्त करून देणे हेच त्यांचे सततचे उद्दिष्ट होते. यासाठी त्यांनी सुयोग्य साधनांची निवड व अचूक माणसाची पारख केली. परकीयांची चाकरी कोणी करावयाचीच नाही हे छत्रपतींचे सुनिश्चित ध्येय होते. त्या ध्येयाला सर्वसामान्य रयतेने मनापासुन पाठिंबा दिला.स्वराज्याचा विस्तार करून सर्व सामान्य रयतेला सुखी केले.

छत्रपतींनी स्थापन केलेले स्वराज्य शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, रयत, स्त्री, पुरूष, अबालवृध्द या सर्वाना ते स्वत:चे वाटले. स्वराज्यात स्त्रियांचा आदर व सन्मान केला, त्यांना विकासाची संधी दिली.त्यातुन त्यांनी लोककल्याणकारी स्वराज्याचे ध्येय पाहिले व ते सत्यात उतरविले. सामान्य रयतेमध्ये स्वाभिमान निर्माण केला. त्यांची मने व मनगटे मजबूत करून स्वराज्याचे देखणे रूप सत्यात उतरविले. या संदर्भात सर जदुनाथ सरकार म्हणतात, लोकांची मने जिंकून छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची संकल्पना त्यांच्या मनात पेरली. साध्या खेडूत लोकांमध्ये ही गोष्ट त्यांच्यासारखा प्रामाणिक व समर्थ प्रशासकच करू शकत होता.त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी लोकांच्या वैयक्तिक महत्वकांक्षेला जागृत करून त्यांना स्वराज्यात विविध संधी उपलब्ध करून दिल्या. संधीचे एक अमर्याद क्षितिजच त्यांच्यासमोर उभे केले. अखेरीस त्यांच्यात छत्रपती शिवाजी महाराजांनी सामूहिक **(पान ६ वर)**

# आत्मसन्मान



ज्योती रानडे

प्रोफेसर कर्णिक मॅडमचा वर्ग जयहिंद कॉलेजचे विद्यार्थी कधीही चुकवत नसत. फिलॉसॉफी सारखा कठीण विषय शिकवताना एखादी निरगाठ अलगदपणे सोडवून सुरगाठ करावी तसा त्या विषय उलगडून विद्यार्थ्यांपुढे ठेवत असत. खादीची इस्त्री केलेली साडी, कोपरापर्यंत लांब ब्लाउज व गळ्यात एक सोन्याची साखळी असलेल्या मॅडम केवळ विद्यार्थ्यांचे आयुष्य घडवण्याच्या उद्देशानेच शिक्षण क्षेत्रात आल्या होत्या.

सोनेरी काडीच्या चष्म्यातून बारीक डोळ्यांनी अगदी मागे बसलेल्या विद्यार्थ्यांचेही काय चाललंय याकडे त्यांचे लक्ष असे. आज त्या आत्मसन्मान (सेल्फ एस्टीम) शिकवत होत्या. नुकतीच कॉलेजला आलेली ही मुले स्वतःला शोधत असतात पण त्यांना आपण कोण आहोत ते अजिबात कळलेले नसते हे त्यांचं मत होतं.

आत्मसन्मान म्हणजे केवळ स्वाभिमान नाही.. आत्मसन्मान म्हणजे स्वतःची योग्य किंमत माहित असणे...काय वाटते तुम्हाला स्वतःबद्दल? आपल्याला आपले गुण, दोष, क्षमता, कौशल्य याची जाणीव आहे का? मॅडम विद्यार्थ्यांच्या अंतरंगात डोकावून बघत होत्या..

मागच्या बेंच वर बसलेल्या शांतीकडे त्यांचे लक्ष गेले. उंच पण अगदी बारीक चण, जाड चष्मा, पक्का काळा रंग व बटबटीत फुले असलेला हिरवा सलवार कमीस घातलेली शांती शरीराने वर्गात असे पण तिचे मन कुठेतरी भरकटलेले असे. वर्ग संपताच मॅडमनी शांतीला हाक मारली. ती कावरीबावरी होऊन त्यांच्यापुढे येऊन उभी राहिली.

शांती, वर्गात शिकवलेले समजतंय ना? मॅडम तिचा अंदाज घेत होत्या.

हो.. म्हणजे नाही.. सगळे नाही समजत. ती जमिनीकडे बघत होती.

माझ्याकडे वर बघ आधी आणि बोल. खाली बघून बोलायला तू काही गुन्हा केला नाहीयेस. मॅडमनी पाण्याचा घोट घेतला.

बा म्हणतोय- उर्मटागत तोंड करून वर बघून बोललीस तर लाथ घालंन. वर बघायचं मला माहित नाही मॅडम. शांतीला शक्य असते तर ती जमिनीच्या आत देखील शिरली असती.

मॅडमनी तिला पुढच्या आठवड्यात भेटायला बोलावले. ती विटलेला पोपटी रंगाचा विटलेला ड्रेस घालून आली.

मला सांग बरं तुझ्या घरच्याबद्दल.. आणि बोलताना माझ्याकडे बघ. मी रागवणार नाही.

मॅडमचा आश्वासक स्वर ऐकून ती थोडी मोकळी झाली.

मॅडम, वडील कामगार आहेत. संध्याकाळी दारूच्या नशेत असतात तेव्हा वेडेवाकडे बोलतात. नाहीतर चांगले आहेत. सावत्र आई तीन भावंडांचे करून दमली आहे. पण ती चांगलीये. मला अभ्यास जमतोय म्हणून आईने वडिलांशी भांडून मला कॉलेजला घातलय पण इथे बसले तरी मला आपण हे योग्य करतो आहे का नाही ते कळत नाही.. पैसे मिळवण्यासाठी नोकरी करू शकते इथं बसण्यापेक्षा.. पण आईला मी शिकायला हवंय व खूप पैसा मिळवायला हवाय कारण.. .तुझ्या असल्या रूपामुळं तुझं लग्न होणार नाही. तुला शिकायलाच हवं म्हणतीये आणि तिचं चूकही नाही.

मॅडमच्या पोटात तुटलं..कसा व कुठून आणेल ही मुलगी सेल्फ रिस्पेक्ट? फिलासॉफीच्या वर्गात लेक्चर ऐकून? का हा स्लाईड शो बघून? वीस वर्षाचं वय. रूप नाही हे तिच्यावर बिंबवण्यात आलंय. काय गुण आहेत याची जाणीव नाही!

शांती तुला काय आवडतं?मॅडम तिच्या काळ्या डोळ्याकडे बघत होत्या.

मॅडम, आवड निवड असे काही नाही. जे सांगितलं ते करायचं. शांतीला आवडनिवड कधीच कुणीच विचारली नव्हती.

आत्ता मला शिकवायचं आहे पण संध्याकाळी आपण चालायला ग्राउंड वर जाऊ. तोपर्यंत विचार कर आपल्याला काय आवडतं याचा मॅडमनी सांगताच ती हो म्हणाली.

ग्राउंड वर दोघी चालत असताना तिने विचारले, मी पळू का? एक राऊंड मारते.

मॅडम तिच्या धावण्याकडे बघून चकित झाल्या. वाऱ्यासारखा वेग होता तिचा. एक मैलाचे अंतर ती इतक्या पटकन संपवून कशी आली?

परत एक राऊंड कर ग. किती वेळात पूर्ण करतेस ते मला बघायचंय.

मॅडमनी फोनवर स्टॉप वॉच लावले. तिचा एक मैल पूर्ण करण्याचा वेळ होता ५:४०:१२ मिनिटे! वर्ल्ड रेकॉर्ड चार-साडेचार मिनिटाचे असते. त्या थक्क झाल्या.

तुला धावायला आवडते का ग? त्या तिला तिचा टाईम दाखवत होत्या.

हो मॅडम! मला धावायला फार फार आवडते.. मी नेहमी पळण्याच्या स्पर्धा जिंकते..

मॅडम हसल्या. त्यांनी लगेच रनिंग कोच म्हेत्रे याना फोन करून सांगितले, तुम्हाला एक उत्तम स्टुडन्ट देते आहे. काय घडवता येते बघा!

शांतीचे कोचिंग सुरु झाले. तीन महिन्यात तिच्यामध्ये आमूलाग्र बदल झाला होता. आत्मविश्वास भरभरून वाहत होता. नुकत्याच झालेल्या कॉलेजच्या स्पर्धेत तिचा तिसरा नंबर आला होता. खाणे पिणे सुधारल्यामुळे तब्येत छान सुधारली होती. चेहऱ्यावर तजेला आला होता. रूप रंग काही का असेना.. आतल्या भावना चेहऱ्यावर डोळ्यातून उतरतात..तो आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी धडपडावे लागतेच.. प्रत्येकाला!!

मॅडम तिच्या आई वडिलांना भेटल्या होत्या..

म्याडम, आमी म्हेत्रे सरांची फी देऊ शकत नाय. शांतीचे बाबा कळकळीने बोलत होते.

दारू सोडणे एवढीच फी द्यायची आहे बघा. मुक्तांगण मध्ये व्यसनमुक्ती साठी मदत करतात तिथे तुम्हाला घातले आहे. मॅडम निर्धाराने बोलत होत्या..

शांतीची आई डोळ्यातलं पाणी पुसत दारामागून पुढे आली.. हात जोडून म्हणाली, म्याडम, विठ्ठल भेटत नाही म्हनतात पन कोनत्या रूपात तो समोर येऊन उभा हाय ते वळखायला आलं म्हंजे झाले.

मॅडमनी तिचे हात हातात घेतले.तू शांतीला शिक म्हणून कायम सांगितलेस ना म्हणून हे सगळे घडून येत आहे ग!

शांत मनाने मॅडम घरी आल्या. शांतीचा आत्मसन्मानाचा पेपर वाचायला घेतला.

तिने लिहलेला एक पॅरिग्राफ त्यांचे डोळे ओले करून गेला..

माणसातील आत्मसन्मान जो आत असतो तो कुणीतरी जागा करावा लागतो. हे सोपे नाही. तो जागा करणारं माणूस भेटायला नशीब लागते. पण एकदा कळले की आपण काही किडा मुंगी म्हणून जन्माला आलो नाही. आपल्या आतही तेच तत्व आहे जे पी टी उषा मॅडममधे आहे. दलदली मधे जर कमळ उगवत असेल तर कामगाराच्या घरात ऑलिम्पिक रनर का निर्माण होणार नाही?

पण त्यासाठी परमेश्वर समोर येऊन उभा हवा जशा प्रोफेसर कर्णिक मॅडम माझ्या आयुष्यात आल्या!

हसून मॅडमनी वर्गातील आभाला मेसेज पाठवला की उद्या मला भेटायला ये. वजन अति असेल तर कुठून येणार आत्मसन्मान आणि हाय सेल्फ एस्टीम? ती पळणारी नसली तरी तिला काही ना काही मार्ग दाखवता येईल.. त्यांनी लगेच ऋजुता दिवेकर याना ई-मेल पाठवली.. एका विद्यार्थिनी च्या आयुष्याचे सोने करायचे आहे आणि त्यासाठी तुमची मदत हवी आहे!

त्यांनी चष्मा काढून टेबलावर ठेवला. असा आत्मसन्मान शिकवला तरच विद्यार्थ्यांना समजेल! वर्गात लेक्चर देऊन कळणार नाही!

आपण सगळे जग बदलू शकणार नाही पण आपल्या हाताखालून जाणाऱ्या काही विद्यार्थ्यांना तरी नक्कीच मदत करू शकतो.. त्यांचा आत्मसन्मान १०% वाढला तरी खूप झाले.. जग असेच बदलू शकू ..

हळूहळू -

# परंपरेच्या बेड्या तोडतांना...

## एकल महिलांच्या अस्तित्वाचा संघर्ष आणि सन्मान

प्रा. नूतन माळवी

महाराष्ट्रात एकल महिलांची संख्या प्रचंड वाढलेली आहे. शेतकरी आत्महत्ये मुळे विधवा झालेल्या, कोविड च्या काळात पती गेल्यामुळे एकल झालेल्या याच शिवाय लग्न तुटण्याचे प्रमाण वाढल्यामुळे किंवा लग्न न करण्याचे प्रमाण वाढल्यामुळे मोठ्या प्रमाणात एकल महिला वाढलेल्या दिसतात. २०११ च्या जणगणनेनुसार भारतात जवळपास ७.३ करोड एकल महिला होत्या तर महाराष्ट्रात तो आकडा ५४ लाख असा नोंदविल्या गेला जो आता १ करोड पेक्षा जास्त असेल. महाराष्ट्रातील सर्व जिल्हा परिषदांनी आता एकल महिलांचे सर्वेक्षण करून आकडे दिलेले आहे. मराठवाड्यातील सर्वेक्षणात ४.९३ लाख एकल महिलांची नोंद ग्रामपंचायत स्तरावरून मिळते. वर्धेचा एकल महिलांचा आकडा २६,२८७ असा समजला आहे. बुलढाणा जिल्हात ८४,०७५ एकल महिलांची नोंद मिळते. मराठवाड्यातील सर्वेक्षणात वेगवेगळ्या विभागाचे दिसून आलेले आहे. सर्वेक्षणाच्या विश्लेषणात विधवा महिला ४ लाख ८४ हजार ६३७, घटस्फोटी २१ हजार १४२, ४० वर्षावरील अविवाहित महिला १६ हजार ६३७ तर वयोगटानुसार विभाजित केल्या तर १८- ३० वयोगटातील ३२ हजार ९६६ महिला, ३१-५० वयातील १ लाख ३९ हजार ७६२ महिला, ५१-६५ वयोगटातील १ लाख ६४ हजार ८१८ महिला व ६५ वर्षापुढील जेष्ठ महिला २ लाख ३ हजार ३८६ महिला असण्याची नोंद अग्रोवन च्या सोर्सेस ने दिली आहे.

एकल महिलांबाबत धोरण आखण्याचे महाराष्ट्र शासनाचे निर्देश आले आहे. अर्थात हे धोरण पहिल्यांच मांडले जात आहे असे नाही. महाराष्ट्रात पहिली परित्यक्ता परिषद २० मार्च १९८८ ला समता आंदोलनाच्या वतीने माननिय इंदूताई पाटणकर यांच्या अध्यक्षतेखाली अहमदनगर जिल्हातील संगमनेर येथे झाली. ही परिषद महाड तळे मुक्ति संग्राम दिनी सर्व जाती धर्मातील परितक्यांची परिषद झाली त्यामध्ये मा. निशा शिउरकर, छाया दातार इत्यादि. सर्व महाराष्ट्र स्त्री मुक्ति चळवळीच्या कार्यकर्त्या, देशातील सामाजिक संस्था, संघटना स्त्रियांच्या संघटना आणि राज्यकर्त्यांचे या परिषदेमुळे परित्यक्त्या स्त्रियांच्या प्रश्नासंबंधी लक्ष वेधले गेले. सांगली जिल्ह्यात सप्टेंबर रोजी स्त्रीमुक्ती संघर्ष समितीच्या वतीने इंदुताई पाटणकर यांच्या नेतृत्वात परिषद झाली. तर मध्ये समाजवादी महिला सभेच्या वतीने धुळे जिल्ह्यात विजया ताई चौक यांच्या नेतृत्वात काम सुरू झाले. मार्च मध्ये समता आंदोलनाने महाराष्ट्रात काढलेल्या परित्यक्ता मुक्ती यात्रे मुळे हा प्रश्न समाजात पोहोचला. मार्च रोजी मुंबईला निघालेल्या मोर्चामुळे महाराष्ट्र सरकारला या प्रश्नाची दखल घ्यावी लागली. सरकारने या प्रश्नावर अभ्यास समिती नेमली.

जानेवारी रोजी सोशालिस्ट फ्रंट च्या वतीने औरंगाबादला घेतलेली परित्यक्ता हक्क परिषद परित्यक्ता, एकल महिलांच्या आणि स्त्रीमुक्ती चळवळीतील ऐतिहासिक घटना आहे. या परिषदेनंतर महाराष्ट्र सरकारने जून मध्ये आपले पहिले महिला धोरण जाहीर केले. या धोरणामध्ये परिषदेने केलेल्या अनेक मागण्या मान्य करण्यात आल्या . मध्ये आलेल्या दुसऱ्या महिला धोरणात आणि तिसऱ्या धोरणात देखील परित्यक्ता आणि एकल महिलांसंबंधी अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. ड. निशा शिवूरकर यांनी लिहिलेल्या लढा' टाकलेल्या 'स्त्रियांच्या या पुस्तकांमध्ये या संपूर्ण आंदोलनाचा,



त्यातून बदललेल्या कायद्यांचां आणि चळवळीच्या यशाचा आढावा घेतला आहे. या चळवळीचा हा दस्ताऐवजच आहे.

महाराष्ट्रात गेली अनेक वर्षे अनेक संस्था आणि संघटना एकल महिलांच्या प्रश्नावर काम करत आहेत. महाराष्ट्रातील सर्व स्त्रियांच्या संघटनांचा एकल महिलांच्या प्रश्नावर स्वतंत्र धोरणाचा आग्रह पासून होता. त्यासाठी सातत्याने विविध परिषदांमधून आणि आंदोलनामधून आम्ही सरकारकडे तशी मागणी केली जात होती. सरकारकडे मागणी करत असतानाच संघटनांनी देखील धोरणांच्या संबंधात अभ्यास आणि मांडणी करत होतो.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान आणि विकास अध्ययन केंद्र यांच्या पुढाकारातून मध्ये एकल महिला धोरणा संबंधात एक विशेष चर्चासत्र आयोजित केले. या चर्चा सत्रात ड निशा शिवूरकर यांनी एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरणाची आवश्यकता या विषयावर बीज भाषण केले. त्यानंतर झालेल्या चर्चेत महाराष्ट्रातील उपस्थित महिला संघटनांच्या कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. त्यातून जून ला एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरणाचा मसुदा प्रसिद्ध करण्यात आला. हा मसुदा तयार करण्यासाठी जेष्ठ कार्यकर्त्या विद्याताई बाळ, आमदार विद्या चव्हाण, ॲड. निशा शिवूरकर, दीप्ती राऊत, रेणुका कड डॉ. आशा मिरगे, डॉ. युसुफ बेन्नूर, इत्यादींचा सहभाग होता.

एकल महिलांसाठी तयार केलेला हा स्वतंत्र धोरणाचा मसुदा महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दिनांक २० डिसेंबर रोजी देण्यात आला. महाराष्ट्राच्या बदललेल्या राजकारणात महाविकास आघाडीचे सरकार बदलले. त्यामुळे ही चर्चा पुढे जाऊ शकली नाही.

चळवळीतील अनुभवी स्त्री कार्यकर्त्यांनी आणि अभ्यासकांनी तयार केलेले एकल महिला धोरण ही महाराष्ट्रातील एकल महिलांच्या चळवळीची निर्मिती आहे. या धोरणाचा मसुदा महाराष्ट्र सरकारकडे आहे. सरकारने एकल महिलांसंबंधी धोरणाचा विचार करताना जून रोजी तयार केलेल्या धोरणाला पायाभूत मानावे. काळानुसार त्यात आवश्यक बदल करावे. धोरण तयार करण्यापूर्वी महाराष्ट्रात यापूर्वी चळवळ म्हणून झालेले काम लक्षात घ्यावे. चळवळीतील कार्यकर्त्यांशी प्रत्यक्ष चर्चा करावी, अशी मागणी महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेच्या शारदा साठे, ॲड. निशा शिवूरकर, छाया दातार, लता भिसे सोनवणे, सुनीता बागल, शुभा खांडेकर, शुभदा देशमुख, अरुंधती पाटील, अमोल केरकर, रेणुका कड, सीमा कुलकर्णी, प्रा.नूतन माळवी तसेच एकल महिलांच्या चळवळीत सातत्याने काम करणाऱ्या विविध संस्था संघटना आणि स्त्रीवादी कार्यकर्त्यांनी केली आहे.

खरेतर एकल महिलांचे धोरण आखताना कोणकोणते मुद्दे घ्यावे याचा रीतसर अभ्यास करण्याची व काळानुसार त्यामध्ये बदल करण्याची फार मोठी गरज आहे व ते केवळ शासकीय खाक्याप्रमाणे कारयचे म्हणून करायचे असे होऊ नये यासाठी सर्व या प्रश्नावर काम करणाऱ्या सामाजिक संघटना कार्यरत आहे ज्यामध्ये साहू एकल महिला यांचेही कार्य सुरू आहे म्हणून हे केवळ दिखाऊपणा नसावी असे कळकळीने वाटते कारण एकल महिलांचे प्रश्न खूप गुंतागुंतीचे आहे. त्यांच्यामध्ये काम करताना हे प्रकर्षाने जाणवते की त्यांच्या मधील मनुस्मृती नियमांमधून आलेली कडिशनिंग व त्यांच्या बाबत वागणाऱ्यांच्या डोक्यातील मनुस्मृती अजूनही जीवंत आहे. त्यामुळे तिच्या बाबतीत अनेक दृष्टीने विचार करण्याची गरज आहे.

एकल महिला मधील व्याख्या ही देखील तपासावी लागणार आहे. केवळ लग्णांनातर एकल एवढीच ही मर्यादित नसावी. पुरुषांचा आधार संपल्यानंतर किंवा त्याचा मृत्यू झाल्यानंतर ती एकल झाली एवढीच सरळसोठ पणे व्याख्या मर्यादित नसावी. आज समाजात असे अनेक नाते संबंध आहेत की जिथे पुरुषाशिवाय ती स्त्री जीवन जगते आहे किंवा तिचे कुटुंबं आहे. ती व्यवस्था केवळ एका स्त्रीने घेतलेल्या सर्व निर्णयांवर असते अशीपण आहे. ज्यामध्ये ती स्त्री देह विक्रय करणारी किंवा पारलिंगी अशीही असू शकते. ती एकटी स्वातंत्र्य जगते आहे. नौकरी, व्यवसाय आणि रोजगार करते आहे. पुरुषाशी लैंगिक संबंध ठेवते आहे आणि त्यापासून गर्भ राहिला तर तो ठेवायचा की नाही हे ती स्वत: ठरविते व आईचे नाव म्हणजेच स्वत: चे नाव देऊन जीवन जागते अशी ही व्यवस्था आज दिसून येते. ज्यामध्ये ती पुरुषांवर अवलंबून नाही, त्यांच्याबद्दल तक्रार नाही व ती मजेत जगते आहे.

म्हणून शासन सत्तेने केलेली आजची व्यख्या ही नकारात्मक आहे. ती व्याख्या पुरुषसत्तेवर आधारलेली अवलंबिलेली परावलंबी व कमजोर स्त्रीची आहे. ती तशी नसावी असे प्रकर्षाने मांडावे लागते. यामध्ये समाजात दोन तट पडलेले दिसतात. एक सौभाग्यवती (जिथे पुरुष पती-परमेश्वर आहे व त्याच्या आधाराने ती जगते आहे. मग पुरुष नसल्यावर ती एकल, विधवा, परित्यक्त्या, घटस्फोटीत, अविवाहित अशी जगते आहे). येथे ती पुरुषाशिवाय असेल तर तिला घृणा, तिरस्कार, अपमान, तिला टाळणे, तिच्याबद्दल सर्वत्र नकार, तिला उपलब्ध आहे अशा भावनेतून पाहणे, तिला भोगाची वस्तु मानून तिच्याशी तसा व्यवहार करणे, इशारे करणे, **(पान ४ वर)**



डॉ.सौ.प्रज्ञा पुसदकर
मो.९४२३७३३६३०

आनंदी वाटचाल

# सुखदुःख

सुखदुःख या राग लोभादी भावना प्रमाणेच मनाला होणाऱ्या भावना आहेत असे लक्षात येते. कोणत्याही कारणांनी मनात अनुकूल संवेदना उत्पन्न होणे याला सुख आणि प्रतिकूल संवेदना उत्पन्न होणे याला दुःख असे म्हणतात. मनात अनुकूल किंवा प्रतिकूल संवेदना म्हणजेच सुखदुःखाच्या भावना या दोन कारणांनी उत्पन्न होतात. एक म्हणजे ज्ञानेंद्रियांचा निरनिराळ्या विषयांशी संयोग किंवा वियोग होणे व दुसरे म्हणजे इष्ट निष्ठ घटना घडणे.




मनुष्याच्या ज्ञानेंद्रियांचा संबंध त्यांच्या विषयांशी आला म्हणजे इंद्रियांना आवडणाऱ्या विषयांचे सेवन केले जात असता मनात सुखाची भावना उत्पन्न होते व न आवडणाऱ्या विषयांचे सेवन इच्छे विरुद्ध करावे लागल्यास किंवा या विषयाची इच्छा मनात होती पण तो विषय प्राप्त न झाल्यास मनात दुःखाची भावना उत्पन्न होते. कानाला गोड वाटणारा आवाज ऐकताना, त्वचेला आरामदायक वाटणारा स्पर्श होतांना ,डोळ्यांना चांगले वाटणारे दृश्य पाहताना ,जिभेला रुचकर लागणारे पदार्थ खाताना, व नाकाला आनंददायी वाटणारा वास घेताना मनात अनुकूल भावना निर्माण होतात आणि त्या सर्वांमुळे मनुष्याला सुख वाटते. पण या उलट कटू शब्द कानावर पडत असता, दुःसह स्पर्श त्वचेला होत असता, ओंगळ दृश्य डोळ्यासमोर दिसत असता बेचव पदार्थ खात असता आणि दुर्गंध नाकात जात असता मनात प्रतिकूल भावना निर्माण होतात आणि मनुष्याला त्यामुळे दुःख होते .आहार निद्रा असे आवश्यक विषयांचे उपभोग जेव्हा हवेसे वाटतात तेव्हा ते न मिळाल्यामुळे म्हणजे विषयेंद्रिय वियोगामुळेही मनुष्याला दुःख होते. विषयेंद्रिय संयोग किंवा वियोग यांच्यामुळे होणाऱ्या सुखदुःखाला शारीरिक सुख दुःख असे म्हणतात. शारीरिक सुखालाच विषय सुख किंवा इंद्रिय सुख असे म्हणतात. जीवनातील कोणती घटना स्वतःला इष्ट किंवा अनिष्ट वाटत असेल तर त्यानुसार ती पुढे घडणार या कल्पनेमुळे ती प्रत्यक्ष घडत असता किंवा ही घडून गेल्यानंतर तिच्या आठवणीने मनाला अनुकूल किंवा प्रतिकूल भावना निर्माण होतात. म्हणजे अनुक्रमे सुख किंवा दुःख वाटते याला मानसिक सुख दुःख असे म्हणतात.

प्रियाजनांचा विरह आर्थिक हानी ,अपमान अपयश किंवा भविष्यकाळी शारीरिक दुःख होण्याचा संभव इत्यादी कारणांनी होणारे दुःख आणि प्रियजन भेट आर्थिक लाभ यश या भविष्यकाळी शारीरिक सुख मिळण्याचे संभोग इत्यादी कारणांनी होणारे सुख हे मानसिकच होय. म्हणजेच विषयेंद्रिय संयोग किंवा वियोग यांच्यापासून प्रत्यक्षपणे होणारे सुखदुःख सोडून इतर सर्व सुखदुखे मानसिक असतात मनुष्याला ज्या गोष्टींमुळे शारीरिक वा मानसिक सुख दुःख होते. त्यांचे तात्कालीन आणि दीर्घकाळ टिकणारे सुखदुःखात्मक परिणाम पाहून सुखाचे सात्विक राजस आणि तामस असे तीन प्रकार दिसून येतात. जेव्हा एखाद्या गोष्टीमुळे प्रारंभी तात्कालीक शारीरिक किंवा मानसिक दुख सोसावे लागते पण अखेर दीर्घकाळ टिकणारे सुख मिळते, तेव्हा त्या सुखाला सात्विक सुख असे म्हणतात. उदाहरणार्थ आजारी मनुष्याला कडू औषध पिताना पथ्य पाळताना तात्कालीत दुःख वाटते पण ते सहन केल्याने व्याधी दूर होऊन पुढे आरोग्य टिकाऊ सुख मिळते हे सात्विक सुख होय.

मनुष्याची स्वाभाविक प्रवृत्ती तत्कालीक सुखपभोग भोगण्याकडे व तात्कालीक दुःख टाळण्याकडे असते. त्यामुळे सामान्य मनुष्याला सात्विक सुखाची गोडी निसर्गतः नसते ती अभ्यासाने म्हणजे सवयीने लावावी लागते.

सात्विक सुख मिळण्याकरिता मनुष्याला आपल्या सदसद विवेक बुद्धीच्या निर्णयानुसार वागावे लागते. हे सात्विक सुखाचे खरे मूळ होय. विषयपभोगापासून जेव्हा तात्कालीक सुख वाटते पण त्याचे परिणाम अपायकारक होऊन पुढे दीर्घकाळपर्यंत दुःख भोण्याची पाळी येते तेव्हा त्या सुखाला राजस सुख असे म्हणतात. खाण्यापणात अतिरेक करणे ,व्याभिचार करणे, ऋण काढून सण करणे, अनिष्ट भावना योग्य विचाराने न आवरता त्यांना बळी पडून अनिष्ट क्रिया करणे इत्यादी गोष्टींपासून जे दुःख होते ते दुःख राजस होय ते राजससुखाचे पर्यवसान दुःखात होते. म्हणून राजस सुख सात्विक सुखापेक्षा हलक्या प्रतीचे असते.

जेव्हा आरंभी किंवा शेवटी ही खरोखर सुख होत नसून अज्ञानामुळे सुखाचा भास होतो तेव्हा त्या सुखाला तामस सुख म्हणतात. अमर्याद झोप आळशीपणा यात जे सुख वाटते ते तामस सुख होय. तामस सुख हे खरोखर सुख नव्हे तो केवळ अज्ञानामुळे वाटणारा सुखाचा आभास असतो.



डॉ.यशवंत सुरोशे
मो.८३८०८६२२१२

उमलत्या कळ्या

# परीक्षा

आई, बाबांना एक सांगशील का? अमृताने आईच्या साडीच्या पदराचं एक टोक हाताने धरत विचारलं.

काय?

म्हणजे मी काय म्हणते, अकरावीला मी नवोदय विद्यालयात प्रवेश न घेण्याचा विचार करतेय. अमृता.

म्हणजे?

म्हणजे मी इथल्या कॉलेजमध्ये ॲडमिशन घेईन म्हणते.

तिकडे करमत नाही का तुला? काय अडचण आहे?

आई, मी वैद्यकीय क्षेत्रात जाण्याचा निर्णय बदललाय.

अगं! पण दुसरं काहीतरी शिकावचं लागेल ना!

पण मेडिकल नको.

कानको? नीटच्या परीक्षेत गोंधळ झालाय म्हणून? की अभ्यासक्रम कठीण आहे म्हणून?

अगं एवढी मेहनत करून परीक्षेत पुन्हा असाच गोंधळ झाला तर मग त्यात आपण कोठेच नसू.मग फायदा काय इतकी मेहनत करून?

तिच्या आईनं गॅस बंद केला. नळाखाली हात धुतले. पदराला हात पुसत ती अमृताकडे न्याहाळून बघू लागली. पोरीच्या तोंडावरील प्रश्नचिन्ह तिला चिंतेत पाडून गेले.

ये इथं बस! सोफ्यावरचेवर्तमानपत्र बाजूला सारता आईने अमृताला सोफ्यावर बसवले.

तुला कसलं टेन्शन आलयंका? तुझ्या मैत्रिणीनं तुला काही सांगितलयका?कसली भीती वाटतेय का?

अगं किती प्रश्न विचारतेयस? मला बोलू देशील की नाही!

हेबघ! तुझे बाबा कामावरून घरी आले की आपण समोरासमोर बसून बोलू.तू अजिबात घाबरू नकोस. तू योग्य निर्णय घेतलास तर आम्ही तुझ्या पाठीशी खंबीरपणे कायमउभे राहू. अर्धवट राहिलेला स्वयंपाक मी पूर्ण करते. तुझे बाबा आले की मग जेवता-जेवता चर्चा करू. तोपर्यंत तूसंस्कृतच्या श्लोकांचेमराठीत भाषांतर करीत बस. असं म्हणत तिची आई स्वयंपाक घरात निघून गेली.

खरंतर अमृता चार वर्षापूर्वी संपूर्ण शाळेतूननवोदय विद्यालयासाठी निवडलेली एकमेव विद्यार्थिनी! गावानं केवढं कौतुक केलं होतं तिचं! ती अभ्यासात हुशार आहे. शिवाय गुणीही आहे. नवोदय विद्यालयासाठी निवड झाल्यावर तिच्या आईला तर खूप आनंद झाला होता. अमृताचे शिक्षक तिचे अभिनंदन करण्यासाठी तिच्या घरी आले होते, तेव्हा अमृताची आई अगदी भारावल्यासारखी बोलत होती.

माझ्या अमृतासाठी मी रात्रदिवस कष्ट करीन. तिची इच्छा असेल तोवर तिला शिकू देईन. मला शिकता आलं नाही, पण माझ्या मुलीला मी उच्चशिक्षण देईन.

तिचे बाबा तालुक्याला प्लॅस्टिक बनवणाऱ्या एका कारखान्यात कामाला जातात.आई घरकामात गुंतलेली आहे. मात्रती दहावीपर्यंत शिकलेली आहे. शिक्षणाचे महत्व तिला पटलेले आहे. त्यामुळे एकलुती एक लेक म्हणून अमृताला वाढवतांना तिने फाजील लाड न करता तिच्यावर चांगले संस्कार केले. अमृता शाळेतून घरी आल्यावर तिचा दररोज थोडातरी अभ्यास घेण्याचा नियम तिने पाळला म्हणून अमृताला यश मिळालं.

नवोदय विद्यालयात गेल्यावरतिथेही अमृताने आपल्या बुद्धीची चमक दाखवली. तिथल्या संगीत विभागात सहभागी झाली. चित्रकला स्पर्धेसाठी ती विभागस्तरावर सहभागी झाली. इतर मुलींसोबत राहून ती भविष्यातील शिक्षणाबाबत विचार करीत होती.

दहावीचा वर्ग सुरु होण्यापूर्वी अमृता आपल्या आईबाबांजवळ डॉक्टर होण्याबाबत बोलली होती. तेव्हापासून त्या तिघांनी एकच स्वप्न पाहिलं आहे.

मात्र वैद्यकीय प्रवेशासाठी असलेल्या नीट या परीक्षेत पेपरफुटीचे प्रकरण झाले नि अमृता मनातून धास्तावली. आपण खाजगी क्लास लावला नाही, तर स्पर्धेत टिकणार नाहीत असं तिच्या मैत्रिणी म्हणतात.

संस्कृत श्लोक मराठीत भाषांतरीत करता-करता संध्याकाळचे सात केव्हा वाजले कळले नाही. तेवढ्यात तिचे बाबाही कामावरून परतले.

जेवण झाल्यावर तिघेही गच्चीत बसले. अमृतानेचसुरुवात केली.

बाबा, नीटच्या परीक्षेलात गोंधळ पाहून मला वाटतं मी माझा निर्णय बदलावा.

तुझी आई बोलली माझ्याशी याबाबत. पण तुला सांगू? नीटसारखीराष्ट्रीय स्तरावर घेतल्या जाणाऱ्या परीक्षाव्यवस्थेत लवकरच सुधारणा होईल. शिवाय तुझ्याकडे निर्णय घ्यायला अजून दोन वर्ष आहेत.कोणतंही क्षेत्र निवडलंस तरीतुला अभ्यास करावाच लागणार आहे. या कालावधीत तू मन लावून अभ्यास कर. तुला आवडेल त्या क्षेत्रातली तू पदवी मिळव. आम्हाला आनंदचं होईल.

खाजगी क्लासवाले जे काही करतात ते....

तुझ्या विद्यालयात नीटसाठी विशेष मार्गदर्शन करतात. आपण मेहनतीने पुढे जाण्याचा मार्ग निवडू. अडचणी येऊ शकतात. त्या अडचणी आपण गृहीत धरल्या पाहिजेत. तुझ्यासारखी लाखो मुले-मुली अशा परीक्षांना सामोरे जातात. त्यांनाही या मानसिकतेतून जावं लागतयं.

बाबा, तुम्ही दोघेही पाठीशी असाल, तर मी नीटच्यापरीक्षेची तयारी नक्की करीन.


बेटा! आयुष्यात अनेक परीक्षांना सामोरे जावं लागतं. त्यात कधी जिंकतो, कधी हरतो. पण प्रत्येक वेळेला त्यातून काही ना, काही शिकत राहतो.तू शिकत रहा.

पोरी! तू हुशार आहेस. तू नक्की पास होशील. मेरीटमध्ये येशील. अमृताची आई म्हणाली. आता माझ्या मनातली भीती नाहीशी झाली. मला वाटायचं पुन्हा-पुन्हा असचं घडत राहील.

व्यवस्थेत योग्य बदल घडवून आणणारी माणसंही आहेत आजूबाजूला. तू विद्यार्थी म्हणून अभ्यासाकडंलक्ष दे. तू तुझ्या इच्छेप्रमाणे डॉक्टर होशील हेनक्की!

मला बाई नसतं काही सुचलं असं सांगायला! तुझ्या बाबांनी सांगितलं तेच बरोबर आहे. असं म्हणत अमृताची आई उठली.

अमृता नि तिचे बाबा दोघे एकमेकांकडे पाहून हसू लागले.



# आठवणींच्या मृगसरी



*टांग! टिंग! टिंगा!*
*ये दौलत भी ले लो ये शोहरत भी ले लो*
*भले छीन लो मुझसे मेरी जवानी*
*मगर मुझको लौटा दो बचपन का सावन*
*वो कागज की कश्ती वो बारिश का पानी*


या फक्त गाण्याच्या ओळी नाहीत तर प्रत्येक मानवी मनाची अभिलाषा आहे. मृगसरींनी माती गंधीत व्हावी तशा बालपणीच्या आठवणी मन सुरभीत करतात आणि आयुष्यभर ओलावा टिकवून ठेवतात. सिक्ग्ध घनदाट छायांच्या राईत पानापानातून सहज प्रकाश किरणे उतरावीत इतक्या सहज बालपणीच्या आठवणी मानसपटलावर अंकित होतात.

पाऊस आणि बालपण हे समीकरण खरं तर भन्नाटच असतं. सकाळपासून अंधारलेलं काळंकुट्ट आभाळ आणि अवनीला भेटायला ढगांच्या तबल्यावर थाप देत कोसळतीच्या समेवर आलेला पाऊस आला रे आला की सुरु व्हायचं आमचं टांग.. टिंग.. टिंगा गाणं अगदी घसा खरवडून! मग तो पाऊस शाळा सुटल्यावर येऊ देत नाहीतर केव्हाही. बेफिकीरपणे भिजायचं.. पुस्तकं ओली झाली, गणवेश खराब होतोय काही काही बघायचं नाही. घरी असलो की पायात चप्पल न घालता लोखंडी सळ्या घेऊन त्या चिखलात रोवत रोवत पार दुसऱ्या कॉलनीत कसे शिरायचो ते कळायचंही नाही. बालपणीचा पाऊसही खूप गोजिरवाणा असायचा. रिमझिम पावसात छोट्या छोट्या रंगबिरंगी छत्र्यांचा झुंबर! पावसाच्या पाण्यात सोडलेल्या नावा, रस्त्याच्या आजूबाजूने वहाणाऱ्या पाण्यात एकमेकांना ढकलणं, मनसोक्त चिखल फेकणं वर आकाशाकडे बघून ते खारट पाणी मोठ्ठा 'आ' वासून पिणं.. आणि त्या विदुषकी वेषातली एन्ट्री घरी आल्यावर आजीचं आम्हाला म्हशी धुतल्यासारखं पाईपने आंघोळ घालणं! आता हसू येतं आठवलं की पण तेव्हा तो ' राजेशाही थाट' वाटायचा! आत गेल्यावर गरम दुधाचा काढा मिळायचा.. मस्त भजी असायची.. आणि सर्दी झाली की मस्त फटका आधी मिळायचा( पण तेव्हाही मनात आपलं सुरूच असायचं.. टांग.. टिंग.. टिंगा..)'इलाज नंतर..

ऋचा सुनील पारेख
मो.९९३०१ २१४९०

खरं तर हा अंबर सतत काही काळ्या ढगांची शाल पांघरून बसत नाही. प्रकृतिकडून झेलणं आपण बालपणीच शिकलेलो असतो. खरं तर पाऊस आणि मानवाचं नातंच अद्भुत आहे. प्रत्येकाचा पाऊस बालपणी सारखाच असतो पण कालांतराने मात्र माणसाच्या मनातल्या सुखदुःखाच्या भावना असोत किंवा आमोद असो सगळंच त्या पावसाला प्रतीक रूपात धरून व्यक्त होतं; पण आपण मात्र आयुष्यभर एकाच प्रतीक्षेत असतो चिंब भिजलेल्या बालपणात! मग होऊन जाऊदे मुक्तपणे. टांग.. टिंग.. टिंगा..





# परिवार
## संस्कारांची शिदोरी आणि मायेचा वटवृक्ष

*घर छोटं असलं तरी चालतं,*
*पण परिवारात प्रेम मोठं असलं पाहिजे,*
*कारण नात्यांतील उब शिवाय,*
*जीवनाला खरा आनंद मिळत नाही.*

परिवार हा शब्द छोटासा आहे पण त्यात संपूर्ण आयुष्य सामावलेलं आहे. परिवाराचे 'संस्कार 'हेच जीवनाचे खरे दागिने आहेत आजच्या धावपळीच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात माणसे भौतिक सुखांच्या मागे धावत आहेत. मात्र खरी शांतता आणि आनंद पैशाने विकत घेता येत नाही. तो फक्त परिवाराने मिळतो.

भारतीय संस्कृतीमध्ये संयुक्त कुटुंब पद्धतीला विशेष महत्त्व आहे. संयुक्त परिवारात प्रेम, एकता आणि संस्कार यांचे सुंदर वातावरण असते. लहान मुलांना मोठ्यांचा आदर करणे, मिळून मिसळून राहणे सोबतच त्यांची गरज समजते. जगात सर्व काही विकत मिळू शकते, पण प्रेमाने जपलेला परिवार कधीच विकत मिळत नाही.

परिवार हा जीवनाचा पाया आहे. पाया मजबूत असेल तर आयुष्यही मजबूत होते. आयुष्याच्या प्रवासात अनेक चढ उतार येतात. कधी आनंद तर कधी दुःखाचे डोंगर कोसळतात. अशा प्रत्येक कठीण प्रसंगी आपली ढाल बनून उभे राहणारे एकमेव कवच, म्हणजे आपला परिवार होय. म्हणूनच परिवाराला आयुष्याचा खरा आधार म्हटले जाते.

परिवार म्हणजे प्रेम, आपुलकी , संस्कार आणि विश्वासाची एक जिवंत प्रयोगशाळा होय. माणसाच्या जीवनातील सर्वात सुरक्षित आणि आनंदायी जागा म्हणजे त्याचा परिवार होय. वडीलधाऱ्यांचे मार्गदर्शन, भावंडांचे प्रेम, आईच्या मायेची उब यांनी माणसाला नेहमी सकारात्मक ऊर्जा मिळते. परिवार हे एखाद्या वटवृक्षा सारखे असते. जे आपल्या सर्व सदस्यांना कडक उन्हातही मायेची आणि सुरक्षिततेची सावली देते. यशाचे शिखर गाठताना परिवाराचा आधार असेल, तर प्रत्येक प्रवास सोपा वाटतो.

सौ जयश्री बिर्ला
मो.९४०४०५६८४३

परिवार असे एक ठिकाण आहे जिथे माणसाच्या जीवनाचा पाया रचला जातो. आणि त्याला संस्काराची शिदोरी मिळते. परिवार हीच माणसाची पहिली शाळा असते. जिथे प्रेम, आदर, सहकार्य शिकायला मिळते. प्रत्येक यशस्वी व्यक्तीच्या पाठीमागे त्याच्या परिवाराचा आशीर्वाद हे प्रोत्साहन असते. परिवाराशिवाय माणसाचे आयुष्य अगदी निरस आणि अपूर्ण वाटते. परिवार ही आयुष्यात मिळालेली सर्वात मोठी भेट आहे. घर विटांनी बनतं पण परिवार प्रेमाने उभे राहतं. कारण परिवारच माणसाच्या आयुष्याला खरी ओळख आणि आनंद देतो. परिवार म्हणजे आनंदाचा खजिना,

जिथे प्रत्येक नातं असतं अमूल्य दागिना !! परिवार टिकविण्यासाठी प्रत्येकाने प्रामाणिक प्रयतक करणे खूप गरजेचे आहे.

नात्यांचा सुगंध दरवळत राहू दे,
प्रेमाचा दीप सदैव पेटत राहू दे,
प्रत्येक घरात आनंद नांदत राहू दे,
प्रत्येक परिवार सदैव एकत्र राहू दे....

# परंपरेच्या बेड्या तोडतांना एकल महिलांच्या अस्तित्वाचा संघर्ष आणि सन्मान

**(पान ४ वरुन)** टोमणे मारणे हे या समाजातील गलीच्छ वर्तन समाजात दिसते आहे. यात जर ती देह विक्रय व्यवसाय करणारी किंवा एकटी स्त्री असेल मजेत जगणारी स्वातंत्र्य विचार सरणीची असेल तिलाही हे फारच भयंकर आहे या बाई पासून दूरच रहा असे सरळ-सरळ संबोधतात. यामध्ये कष्टकारी कामगार महिला असतील, मुस्लिम किंवा इतर अल्पसंख्यांक दलित आदिवासी भटक्या स्त्रिया असतील तर ही स्थिति संपूर्ण नकारात्मक पुरुषवार अवलंबिलेली असावी ही राज्य संस्था, समाज व्यवस्थेतील विवाह संस्था यांची पकड असलेली सर्व प्रकरची बांधणी आहे त्यामुळे एकल महिलांची व्याख्या करताना व्यापक विचार केला गेला पाहिजे. तिच्या कडे पाहण्याची नजर ती विधवा, ती नवऱ्याने टाकलेली इत्यादि. प्रकारे ओळखली जाऊन वागण्याची नसावी. हे या देशात मात्र पुरुषांच्या बाबतित घडत नसते. नवरा नसला, मेला, गेला, केलाच नाही तर ती बिचारी, अवदसा, पापी, नवरा खाणारी, पांढऱ्या पायाची, चरित्रहीन आहे हे मान्य या विरूद्धचा हा लढा आहे.

तिला यासाठी बाहेर निघावे लागणार आहे. सम्मान मिळवा म्हणून हे धोरण सोबतीला असावे. त्यामध्ये तिला शिक्षण मानसिक धैर्य, भावनिक, आर्थिक, लैंगिक स्वावलंबन प्रथम येते. माहेरा-सासर कडून आर्थिक वाटा किंवा संपत्तीचा अधिकार तिला मिळाला पाहिजे. हा विषय व्यापक करावा म्हणून तिच्या व्याखेत आत्मसम्मान असावा. ट्रान्स वुमन शहरी, ग्रामीण, आदिवासी, दलित, मुस्लिम यांचे त्याचबरोबर बेघर महिला, वननिवासी महिला, उसतोडणी कामगार, शेतकरी महिला, आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिला, वीटभट्टीवर काम करणाऱ्या महिला एकूणच असंघटित सर्व महिलाना ओळख पत्र, प्रमाण पत्र मिळावे ज्याद्वारे तिला एकल महिला धोरणा अंतर्गत आरोग्याच्या योजना, शेल्टर होम, अविवाहित असताना मातृत्व नाकारणे वा स्वीकारण्यचा हक्क निवास, रेशन कार्ड, नागरिकत्वाचे पुरावे इत्यादि मिळावे व बजेटमध्ये तिची स्वातंत्र्य ओळख ठेऊन तिला या देशातील संपत्तीचा वाटा मिळवा, सामजिक दर्जा मिळवा एवढच याप्रसंगी वाटते.

# खानदेशातील समाज सुधारक आणि समाजसेवक




खादी ग्रामोद्योग, नशाबंदी ग्राम सुधारणा,सहभोजन, विधवा विवाह, बेटीव्यवहार, प्रौढ विवाह, सर्वधर्मसमभाव, अस्पृश्यता निवारण,हिंदू- मुस्लिम ऐक्य हे समाजात हळूहळू प्रचलित होऊन शहरातून ते ग्रामीण भागातील लहान-लहान गावापर्यंत सुधारणावादी व समाज परिवर्तनाचे विचार पोहोचवण्याचा प्रयतक तत्कालीन समाज सुधारकांनी केला. त्याकाळात खानदेशात समाज सुधारणा कार्यात असलेला जोश, उत्साह, निष्ठा, आस्था,त्याग, सेवाभाव प्रचंड प्रमाणात दिसत होता. महात्मा गांधी व साने गुरुजींच्या अनुयायीवर्ग खानदेशात सामाजिक शैक्षणिक सेवा करीत त्याकाळी सक्रिय राहिलेल्या दिसून येतो. कार्ल मार्क्स, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज,महात्मा गांधी डॉ.बाबासाहेब आंबेडकर ,साने गुरुजी यांच्या विचार प्रवाहातून त्या काळात खरी सामाजिक आर्थिक समता, सर्वधर्मसमभाव आणि दलितोद्धाराची उद्दिष्टे साध्य करण्यासाठीचे प्रयतक दिसून येतात

**श्री.आत्माराम सखाराम अत्रे उपाख्य लोकश्री अत्रे गुरुजी-**

पूर्व खानदेशातील दलित मित्र श्री.अत्रे गुरुजी हे राजकीय चळवळी, सामाजिक सुधारणा कार्यात अग्रभागी असलेले सेवाभावी शिक्षक ,एक ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक म्हणून प्रसिद्ध होते. पूर्व खानदेशातील समतेच्या लढ्यातील ज्येष्ठ कार्यकर्ते म्हणूनही त्यांची ओळख राहिली आहे.सामाजिक सुधारणा कार्यात श्री.अत्रे गुरुजी या सेवाभावी शिक्षकाने, राजकीय

आंदोलना बरोबरच हरिजन, भंगी, हिंदू-मुस्लिम ऐक्य या घटकांसाठी झटून समतेसाठी वाहून घेतले.'भंगीमुक्ती' चळवळ चालवून एका हातात झाडू आणि दुसऱ्या हातात मैला भरण्याची बादली घेऊन, सफाई कार्यक्रम राबविला. 'खादी-हिंदी-हरीजन' ही घोषणा करीत मानवतावादी भूमिकेतून सेवाकार्य चालविले. 'कदम गुरुजी श्री. अत्रे गुरुजी' यांना' खानदेशचे राम-लक्ष्मण' म्हणून ओळखले जाई. अत्रे गुरुजी व सौ. सुशिलाबाई अत्रे यांनी महार, मांग, चांभार, भंगी यांना आपल्या घरादारातून वावरण्याची मुभा दिली म्हणूनच अत्रे गुरुजी हे श्री. अप्पासाहेब पटवर्धन, कृष्णदास शहा, अप्पासाहेब उपाध्ये, काकासाहेब बर्वे या हरीजन सेवकांपैकी एक होते.' देशातील अस्पृश्यांच्या दयनीय स्थितीबद्दल व्यथीत होत.



भंगी, महार, चांभार, मुस्लीम मुला-मुलींना ऑगस्टला अथवा सणासुदीच्या दिवशी जेवणासाठी घरी बोलवून त्यांना सन्मानाने जवळ करीत. जातीयवादाचे उच्चाटन व्हावे, हरिजन सेवा कार्याला हातभार लावावा. आंतरजातीय विवाह व्हावेत, वृत्तपत्रांनी जातीयता मोडून काढण्यासाठी लिहावे या गोष्टी आशावादी दृष्टिकोनातून अत्रे गुरुजी जाहिरपणे मांडीत असत. आपल्याबरोबर हरीजनाला जेवण देणाऱ्याकडेच ते जेवण घेत. नारायण कासार या आपल्या सहकाऱ्याबरोबर दर शुक्रवारी अत्रे गुरुजी भंगी काम करीत. प्रचार न करता हे कार्य सुरू ठेवून आपल्या धर्मपतकीलाही सोबत घेत.'मानवता प्रेमी मंडळ' स्थापन करून वैकुंठ दर्शन (भंगी भक्ती), मानवता संजीवन मोहिम (अस्पृश्यता निवारण), मानवता प्रीती संगम (हिंदू-मुस्लीम - हार्दिक सख्य) हे तीन क्रांतीकारी प्रयोग या मंडळाच्या वतीने राबविलेत. पूर्व खानदेश जिल्हाभर हे कार्य सुरू ठेवले. हळूहळू लोक त्यांच्या सोबत येऊ लागले. काकासाहेब बर्वे, आप्पासाहेब उपाध्ये हे अत्रे गुरुजींचे मित्र होते. भंगी मुक्तीसाठी यांच्यातील सख्य सुधारणाकार्यात महत्त्वाचे ठरले. साने गुरुजींनी श्री. अत्रे गुरुजींच्या कार्याचे कौतुक केले. मानवता प्रेमी मंडळाच्या वतीने सुरू असलेल्या उपक्रमामुळे समाजातील मान्यवरांचे त्यांना सहकार्य मिळत राहिले. महात्मा गांधी, विनोबा भावे यांच्या प्रेरणा अत्रे गुरुजींच्या या सेवाकार्यात असल्यामुळे पूर्व खानदेशातील कार्यकर्त्यांचीही मदत त्यांना मिळत राहिली. हरिजन नवाह साजरा करणे, पदयात्रा काढून हरिजन उद्धाराचे उपक्रम करणे इ. गोष्टी श्री. अत्रे गुरुजी आयुष्यभर करीत राहिले. हिंदू-मुस्लीमात अत्रे गुरुजी लोकप्रिय होते. हरिजन सेवक संघाच्या पूर्व खानदेशातील पदयात्रेतून श्री. अत्रे गुरुजी आपल्या सहकाऱ्यांसमवेत सहभागी झाले होते. सर्व धर्मीयांना बकरी ईद निमित्त सह भोजनासाठी एकत्र आणून गांधीजींच्या कल्पनेतील समुद्रात निश्चित समाज निर्माण व्हावा या हेतूने मानवता प्रेमी मंडळाच्या वतीने अनेक उपक्रम त्याकाळी अत्रे गुरुजींनी राबविले.सामाजिक समतेसाठी मानवताप्रेमी मंडळाच्या वतीने गुरुजींनी निर्धारपूर्वक आपले कार्य शेवटपर्यंत सुरू ठेवले.

**अण्णासाहेब दत्तात्रय गणेश काळे-**

सुप्रसिद्ध इतिहासतज्ञ आणि सेवाभावी कार्यकर्ते अण्णासाहेब द. ग. काळे यांनी अस्पृश्यता निवारण, भंगीमुक्ती, हिंदू-मुस्लीम ऐक्य यासाठी सामाजिक जागृती कार्यात पुढाकार घेतला. समाजातील अस्पृश्य, असहाय्य, उपेक्षितांसाठी त्यांनी भारत सेवक समाजाच्या मदतीने 'सेवासदन आश्रम' काढण्याची योजना बनविली होती.

वृत्तपत्रातून आपली भूमिका मांडून खेड्यापाड्यातून अस्पृश्यता दूर व्हावी, असे आवाहन त्यांनी केले. अस्पृश्यता निवारणासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जाहीर विनंती व निवेदन करत अस्पृश्यास सरकारकडून खेड्यापाड्यातून तलाठी, पोस्टमास्तर या जागा मिळवून देण्याचा प्रयत्न करावा, जेणेकरून वरील जागा सरकारने अस्पृश्यांना दिल्यावर खेड्यातूनही अस्पृश्यता नाहीशी होण्यास मदत होईल असे नम्र निवेदन केले.शिक्षण, आरोग्य, निवारा या गोष्टी त्यांना सरकारने पुरवाव्यात, अशी मागणी करून, हिंदू-मुस्लीम ऐक्यासाठी गावोगावी भेटी दिल्यात. अण्णासाहेब काळे यांनी चितोडेवाणी समाजसेवा संघ स्थापन करून त्यांच्या उन्नतीसाठी मार्गदर्शनही केले. सार्वजनिक जीवनात अण्णासाहेबांनी जागृत प्रतिनिधी म्हणून भूमिका बजावून मंदिरांच्या मालमत्तेची लूट करणाऱ्या पूजारी तथा बुवांच्या विरोधात आवाज उठविला.भंगीमुक्ती प्रमाणेच 'वेश्यामुक्ती' साठी स्वतःहून पुढाकार घेऊन खानदेश-वऱ्हाड प्रांतात 'वेश्यापरिषदे'चे आयोजन केले. यासाठी 'वारांगना' मासिक चालविले. वेश्या उन्नतीसाठीच्या चळवळीचे नेतृत्व केले. कुष्ठरोगाच्या उचाटनासाठी मोहिम काढून, खानदेशातील महारोग्याची पहाणीची योजना, या आजाराचे निवारण करण्याची योजना, महारोग्यासाठी स्वतंत्र आरोग्यधाम स्थापन करण्याची योजना अशा मागण्या अधिकृत संस्थांच्या माध्यमाने केल्यात. याला सरकार दरबारी मदत मिळावी असे प्रयतक केलेत.

सावकारी प्रथेतून होणाऱ्या शोषणाविरुद्ध आवाज उठविला, जातीपरिषदातून मार्गदर्शन केले. असोदे (पूर्व खानदेश) येथील सुधारणाकार्यात अनेक सहकारी अण्णासाहेबांना मिळाले. इतिहास लेखनाची आवड असलेल्या अण्णासाहेब काळे यांनी अनेक नियतकालिके, मासिकांचे संपादकत्व भूषविले. वृत्तपत्रातून समाज जागृतीपर लिखाण करून अण्णासाहेब काळे यांनी खानदेशातील सुधारणावादी चळवळीला सक्रिय सहकार्य दिले.

श्री. केशव महादेव अंबोडेकर, जोशी उपाख्य अंबोडेकर बुवा-

धुळे जिल्ह्यातील आंबोडे येथील श्री.केशव महादेव जोशी यांनी राजकीय जीवनात ब्रिटिश साम्राज्यविरुद्ध लढा दिला. त्याबरोबरच खानदेशातील समाजसुधारणा कार्यात स्वतःपासून सुरुवात करून मोठी भर घातली. खानदेशात ते 'अंबोडेकर बुवा' या नावाने लोकप्रिय होते. समाजसुधारणा कार्यात स्वतः पासून सुरूवात करून, राष्ट्रीय कार्याबरोबर पश्चिम खानदेशातील सामाजिक सेवा कार्यात अंबोडेकर बुवांनी चांगले योगदान दिले. साने गुरुजींच्या कार्यातून प्रेरणा घेऊन किसान कामगारांच्या जागृतीसाठी अंबोडेकर बुवांनी सतत धडपड केली. सुरूवातीच्या काळात समाजवादी सेवक असलेले अंबोडेकर बुवा नंतरच्या काळात साम्यवादी बनले. एका सुधारणावादी कीर्तनकार अंबोडेकर बुवांनी कीर्तनाच्या माध्यमाने जनजागृती घडवून आणली. संधीसाधू व पोटभरु बुवाबाजी करणाऱ्या लोकांसारखे नव्हे तर कीर्तनातून सुधारणावादी भूमिका मांडली.

हिंदू - मुस्लीम दंग्यात भीती न बाळगता उडी टाकून संघर्ष मिटविण्याचे धाडस त्यांच्यात होते. अस्पृश्यता निवारण कार्य, दलित उन्नती, यासाठी मार्गदर्शन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराच्या भूमिकेस जाहीर पाठिंबा देऊन, श्री. मेढे गुरुजी, श्री. बिऱ्हाडे गुरुजी, डॉ. म्हसकर, श्री. जठार, श्री. दादासाहेब भाऊराव गायकवाड अशा मान्यवरांसह समाज सुधारणेच्या प्रयतकात सक्रिय सहभाग दिला.

कीर्तनातून मानवतावादाचा पुरस्कार केला. संत गाडगे महाराजांसमवेत काहीकाळ घालवून, घोंगडेबुवा म्हणूनही ते नावारूपास आले. में रोजी धुळे येथे एका पश्चातापपूत पतीत कलावती राजपूत या महिलेशी विवाह करून अनेकांना धक्का दिला. सनातन्याच्या विरोधात आणि सेवाभावी, सुधारणावादी, ब्राह्मणेतरांच्या पाठिंब्याने हा विवाह पार पडला. अनसुयाबाई साली पाचोरा येथे आदिवासी मुलांसाठी 'डोंगरी भिल्ल सेवाश्रम' चालविला. साने गुरुजींचे या कामी सहाय्य लाभले. खानदेशातील क्रांतीसिंह नाना पाटलांच्या बैठकांना ते उपस्थित राहात असत. सार्वजनिक जागृती' हा त्याचा मुख्य हेतू राहिला. आपल्या पतकीला लिहिणे, वाचणे शिकवित असताना स्वतः अंबोडेकर बुवांनी' लिखाणीही केले. 'मारुतीचे फुले' हे कथांचे लहानसे पुस्तक त्यांनी सानेगुरुजींना अर्पण केले. 'संत परंपरा आणि नवा दृष्टिकोन' ही छोटी पुस्तिका लिहून संत कार्याबद्दलची विधायक भूमिका मांडली. पंढरपूर विठ्ठल मंदिराबद्दलही त्यांनी स्पष्ट भूमिका घेऊन मंदिराचा कारभार सरकारने ताब्यात घ्यावा अशी मागणी केली. श्री अंबोडेकर बुवांनी कीर्तनातून मानवतावादाचा प्रचार केला. 'मारुतीची फुले' हा लहानसा कथासंग्रह लिहून सामाजिक विषमतेवर प्रहार त्यांनी केला.

**श्री. रंगनाथ राजाराम टोणगावकर उपाख्य अण्णासाहेब टोणगावकर-**

बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिल्याशिवाय समाज आणि राष्ट्राचा उद्धार होणार नाही असे परखड मत व्यक्त करीत आपल्या शिक्षकी जीवनात त्यांनी बहुजनांना शिक्षणाचे पटवून दिले.स्वराज्य प्राप्तीच्या आंदोलनात सहभागी होऊन पश्चिम खानदेशात ध्येयवादी वृत्तीने आणि समतेच्या तळमळीने सामाजिक कार्यात शिक्षकाची भूमिका बजावली. स्वोद्धारक विद्यार्थी वसतिगृहाची स्थापना धुळे, दोंडाईचा या ठिकाणी झाली. या संस्थेच्या प्रचार कार्यात अण्णासाहेब गुंतून गावोगावी हिंडलेत. या कार्यात आर्थिक मदत मिळविली. श्री. ठोंबरे, श्री. नवल आनंदा पाटील, श्री. व. गु. कुलकर्णी यांच्याबरोबर अण्णासाहेब टोणगावकर यांनी या संस्थेत शिक्षक म्हणून सेवा केली. (पान ६ वर)

---

# गिफ्ट घेण्यापूर्वी जाणून घ्या आयकर कायद्याच्या तरतुदी




करदात्यांच्या मनात एक अतिशय सामान्य आणि वारंवार येणारा प्रश्न (गिफ्ट) भेटवस्तूंची करपात्रता. भारतात एकमेकाला गिफ्ट देण्याची परंपरा फार पूर्वीपासून चालत आलेली आहे मित्र - मित्राला, नातेवाईक- नातेवाईकांना किंवा घरातील मंडळी आपल्या घरातील सदस्यांना गिफ्ट देत असतात. परंतु गिफ्ट देण्याघेण्याच्या व्यवहारातून टॅक्स चोरी होऊ लागली किंवा टॅक्स वाचवण्यासाठी गिफ्ट दिले जाऊ लागले त्यामुळे शासनाने आयकर कायद्यात विशिष्ट प्रकारच्या गिफ्ट वर टॅक्सची तरतूद आणली. आयकर कायद्याच्या तरतुदीनुसार सर्व गिफ्टला टॅक्स पासून सूट नाही. कायद्याच्या काही तरतुदीनुसार गिफ्टला देखील टॅक्स लावण्यात येत असतो. आज त्याच सर्व तरतुदीचा अभ्यास आपण या लेखातून करणार आहोत.

गिफ्ट म्हणजे भेट म्हणून मिळालेली वस्तू ,पैसे किंवा संपत्ती. कोणतीही रक्कम किंवा वस्तू मोबदला न घेता प्राप्त झाली, त्याला भेट असे म्हटले जाऊ शकते.

आयकर कायद्याच्या दृष्टिकोनातून, (गिफ्ट) भेटवस्तू खालीलप्रमाणे वर्गीकृत केली जाऊ शकते: :-

१) मोबदला न घेता प्राप्त झालेली कोणतीही रक्कम; त्याला 'मौद्रिक भेट' म्हणता येईल.

२) मोबदला न घेता प्राप्त झालेली विशिष्ट जंगम मालमत्ता 'भेट'

३) कमी किंमतीवर प्राप्त झालेली विशिष्ट जंगम मालमत्ता (म्हणजे अपर्याप्त किंमतीला), याला 'जंगम मालमत्ता त्याच्या वाजवी बाजार मूल्यापेक्षा कमी किंमतीला मिळालेली मालमत्ता' असे म्हणता येईल.

४) मोबदला न घेता प्राप्त झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता.

५) कमी किमतीत (म्हणजे अपुऱ्या मोबदल्यासाठी) विकत घेतलेली स्थावर मालमत्ता. 'मुद्रांक शुल्क मूल्यापेक्षा कमी किंमतीला मिळालेली स्थावर मालमत्ता' असे म्हटले जाते.

वैयक्तिक किंवा हिंदू अविभक्त कुटुंब (एचयुएफ) यांना मिळालेल्या आर्थिक रोक रक्कम (मौद्रिक) भेट किंवा गिफ्टची कर आकारणी :-

१) आयकर कायद्यात दिलेल्या संज्ञेतील नातेवाईक यांच्या व्यतिरिक्त इतर व्यक्तींकडून मोबदला न घेता प्राप्त झालेल्या पैशांची रक्कम/ मिळालेले आर्थिक रोक रक्कम (मौद्रिक भेट) वर्षभरात पन्नास हजार पर्यंत मिळाल्यास आयकर लागत नाही परंतु जर ही मिळालेली रक्कम ५०००० पेक्षा जास्त असली तर पूर्ण रकमेवर आयकर इतर उत्पन्न शीर्षकांतर्गत भरावा लागतो.

उदाहरण १- अनिल याने आपला मित्र सुनील याला त्याच्या वाढदिवसानिमित्त किंवा घरातील इतर कार्यक्रमानिमित्त दहा हजार रुपये गिफ्ट दिले या उदाहरणात मिळालेली गिफ्ट ची रक्कम ५० हजारापेक्षा कमी असल्याने टॅक्स लागणार नाही परंतु जर या उदाहरणात मित्राने ६० हजार रुपये गिफ्ट दिले तर सुनील ला पूर्ण रकमेवर टॅक्स भरावा लागेल. कारण मित्र हा नातेवाईक या संज्ञेमध्ये आयकर कायद्यानुसार येत नाही. उदाहरण

२- अनिल ने आपला मित्र सुनील ला त्याच्या लग्नानिमित्त ७० हजार रुपये गिफ्ट म्हणून दिले या उदाहरणात देखील सुनीलला टॅक्स लागणार नाही. कारण आयकर कायद्यानुसार लग्नाच्या वेळेस मिळालेल्या गिफ्ट वर टॅक्स लागत नाही. जरी त्याची रक्कम ५०००० पेक्षा जास्त असेल. आयकर कायद्यानुसार नातेवाईक आणि इतरांकडून लग्नाच्या वेळेस मिळालेले गिफ्ट आयकर कायद्यात सूट आहे.

२) आयकर कायद्यात नमूद असलेल्या नातेवाईककडून मिळालेली आर्थिक पैशाची रोख रक्कम मौद्रिक भेट यावर कोणताही कर आकारला जात नाही यासाठी कोणतेही मर्यादा नाही. म्हणजेच आपण आपल्या नातेवाईकांकडून भेट किंवा गिफ्ट घेऊ शकतो देऊ शकतो त्याला कोणताही आयकर भरावा लागणार नाही.

उदाहरण ३-मोठ्या भावाने लहान भावाला एक लाख रुपये गिफ्ट दिले किंवा आई-वडिलांकडून मुलाला पाच लाख रुपये गिफ्ट मिळाले, पतीने पतकीला एक लाख रुपये गिफ्ट दिले, किंवा आजी आजोबांकडून नातवाला एक लाख रुपये गिफ्ट मिळाले उदाहरणांमध्ये ज्याला गिफ्ट मिळाले आहे त्याला टॅक्स भरावा लागणार नाही. कारण गिफ्ट देणारे हे आयकर कायद्याच्या नातेवाईक या संज्ञा मध्ये येतात. आणि नातेवाईकांकडून मिळालेल्या गिफ्ट वर कोणताही टॅक्स लागत नाही

आयकर कायद्याच्या तरतुदीनुसार नातेवाईक म्हणजेच - व्यक्तीचा जोडीदार; व्यक्तीचा भाऊ किंवा बहीण; व्यक्तीच्या जोडीदाराची बहीण किंवा भाऊ; व्यक्तीच्या पालकांपैकी एकाचा भाऊ किंवा बहीण; व्यक्तीचे वंशज किंवा पूर्वज; जसे की पालक, आजी आजोबा किंवा पणजोबा, मुले, नातवंडे इत्यादी. व्यक्तीच्या जोडीदाराचा कोणताही वंशज किंवा पूर्वज.



३) व्यक्तीच्या लग्नाच्या निमित्ताने भेट किंवा गिफ्ट मिळालेला पैसा, वारसाद्वारे मिळालेला पैसा, त्याला कोणताही आयकर भरावा लागणार नाही.

४) परंतु वाढदिवस, वर्धापनदिन इत्यादी प्रसंगी मिळालेल्या भेट किंवा गिफ्ट मिळालेला पैसावर आयकर आकारला जाईल.

वैयक्तिक किंवा हिंदू अविभक्त कुटुंब (एचयुएफ) यांना भेट किंवा गिफ्ट मिळालेल्या स्थावर मालमत्तेवर कर आकारणी :-

आयकर कायद्यात दिलेल्या संज्ञेतील नातेवाईक यांच्या व्यतिरिक्त इतर व्यक्तींकडून मोबदला न घेता प्राप्त झालेल्या स्थावर मालमत्ता, जमीन किंवा इमारत किंवा दोन्ही भांडवली मालमत्ता आहे. प्राप्त झालेल्या अशा स्थावर मालमत्तेचे मुद्रांक शुल्क मूल्य रु. ५०,०००. पेक्षा जास्त असली तर पूर्ण रकमेवर आयकर इतर उत्पन्न शीर्षकांतर्गत भरावा लागतो. परंतु नातेवाईकांकडून मिळालेल्या स्थावर मालमत्तेवर कर आकारला जाणार नाही जरी तिची किंमत ५०००० पेक्षा जास्त असेल तरी. व्यक्तीच्या लग्नाच्या निमित्ताने भेट किंवा गिफ्ट मिळालेल्या स्थावर मालमत्तेवर आयकर आकारला जाणार नाही.

उदाहरण ४- अनिल ने सुनील कडून दहा लाख रुपये मुद्रांक शुल्क मूल्य (शासकीय किंमत)असलेली जागा सात लाख रुपयात खरेदी केली या उदाहरणात मुद्रांक शुल्क मूल्य (शासकीय किंमत) व खरेदी किंमत यातील फरक तीन लाख रुपये आहे त्यामुळे अनिलला तीन लाख रुपयावर टॅक्स भरावा लागेल.

परंतु अनिल ने सुनील कडून सदर मालमत्ता ही नऊ लाख साठ हजार रुपये किमतीत खरेदी केली तर शासकीय किंमत व खरेदी किंमत यातील फरक चाळीस हजार आहे म्हणजेच पन्नास हजाराच्या आत आहे म्हणून अनिलला चाळीस हजारावर टॅक्स भरावा लागणार नाही.

उदाहरण ५- आई-वडिलांकडून मुलाला दहा लाख किंमत असलेलं त्यांचं घर हे गिफ्ट म्हणून मिळालं या उदाहरणात देखील मुलाला टॅक्स लागणार नाही कारण मिळालेली मालमत्ता ही आई वडील म्हणजेच नातेवाईकांकडून मिळालेली आहे. आणि आयकर कायद्यानुसार नातेवाईकांकडून गिफ्ट म्हणून मिळालेल्या मालमत्तेवर टॅक्स भरावा लागत नाही.


वैयक्तिक किंवा हिंदू अविभक्त कुटुंब (एचयुएफ) यांना भेट किंवा गिफ्ट मिळालेल्या विशिष्ट जंगम मालमत्तेवर कर आकारणी :-

विशिष्ट जंगम मालमत्ता म्हणजे शेअर्स/ सिक्युरिटीज, दागिने, पुरातत्व संग्रह, रेखाचित्रे, चित्रे, शिल्पे किंवा कला आणि बुलियनचे कोणतेही काम, या सर्व करदात्याची भांडवली मालमत्ता आहे. वर्षभरात करदात्याला मिळालेल्या अशा विशिष्ट जंगम मालमत्तेचे एकूण बाजार मूल्य रु. ५०,००० पेक्षा जास्त असली तर पूर्ण रकमेवर आयकर इतर उत्पन्न शीर्षकांतर्गत भरावा लागतो. परंतु नातेवाईकांकडून मिळालेल्या विशिष्ट जंगम मालमत्तेवर कर आकारला जाणार नाही वरील व्याख्येमध्ये समाविष्ट असलेल्या जंगम मालमत्ता व्यतिरिक्त, कोणत्याही गोष्टीवर कर आकारला जाणार नाही. उदा. भेट म्हणून मिळालेल्या मोबाईल फोन, लॅपटॉप, इतर वैयक्तिक वापराच्या वस्तू कारण त्यांचा विशिष्ट जंगम मालमत्ता व्याख्येमध्ये समावेश नाही. विहित विशिष्ट जंगम मालमत्ता एखाद्या व्यक्तीकडून किंवा (एचयुएफ) कडून कमी दरात प्राप्त झाल्यास करपात्रता-

वर्षभरात करदात्याला प्राप्त झालेल्या एकूण विशिष्ट जंगम मालमत्तेचे बाजार मूल्य व त्याने दिलेला मोबदला यातील तफावत ५०००० पेक्षा जास्त असेल तर अशा जास्तीच्या रकमेवर त्या व्यक्तीला आयकर भरावा लागतो. परंतु नातेवाईकांकडून कमी दरात प्राप्त झाल्यास बाजार मूल्य व मोबदला यातील तफावत ५० हजारापेक्षा जास्त जरी असली तरी त्यावर आयकर भरावा लागत नाही. (पान ६ वर)

---

# चैतन्य-चिन्मय आणि चार जेसीबींची गोष्ट




चैतन्य आणि चिन्मय हे जुळे भाऊ. दोघांचे वय जेमतेम तीन वर्षे. पण त्यांच्या मनात एक वेगळेच आकर्षण होते. इतर मुलांना जसे कार, ट्रेन किंवा विमान आवडते, तसे त्यांना मात्र जेसीबीचे प्रचंड वेड होते. पिवळ्या रंगाचा मोठा जेसीबी दिसला की दोघांचे डोळे चमकायचे.

रोज सकाळी उठल्यावर त्यांचा एक ठरलेला कार्यक्रम असायचा. मोबाईलवर युट्युब उघडायचे आणि जेसीबीचे व्हिडिओ पाहायचे. जेसीबी माती उचलतो, खड्डे खणतो, दगड बाजूला करतो, हे सगळे ते मोठ्या कुतूहलाने पाहत बसायचे. चैतन्य म्हणायचा, पहा, माझा जेसीबी किती छान काम करतो! चिन्मय लगेच म्हणायचा, हा माझा आहे. तो मोठ्ठा खड्डा खणतो! त्यांच्या या निरागस बोलण्यावर घरातील सगळेच हसायचे. पुण्याला राहणाऱ्या काकांना चैतन्य आणि चिन्मय प्रेमाने चाचू म्हणायचे. व्हिडिओ कॉल सुरू झाला की दोघांचा पहिला प्रश्न असायचा चाचू, आम्हाला जेसीबी आणून द्या ना!



चाचू, मोठा जेसीबी आणणार ना? चैतन्य विचारायचा. हो, खूप मोठा! चिन्मय त्यात भर घालायचा.

चाचूंनी त्यांच्या या आवडीसाठी आधीच दोन सुंदर खेळण्यातले जेसीबी आणून ठेवले होते. ते व्हिडिओ कॉलवर दोघांना ते जेसीबी दाखवायचे. ते पाहून दोघे आनंदाने टाळ्या वाजवायचे. आता पुण्याला कधी जायचे आणि ते जेसीबी हातात कधी घ्यायचे, याचीच त्यांना उत्सुकता लागून राहायची.

एके दिवशी आम्ही सगळे पुण्याला गेलो. घरात पोहोचताच चाचूंनी दोघांना एका खोलीत नेले. टेबलावर दोन सुंदर पिवळे खेळण्यातले जेसीबी ठेवलेले होते.

दोघांनी ते पाहिले आणि आनंदाने उड्याच मारल्या.

हा माझा! हा माझा!

असे म्हणत दोघांनी ते जेसीबी हातात घेतले आणि खेळायला सुरुवात केली. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून चाचूही हसत होते.

थोड्याच वेळाने ते गॅलरीत गेले. समोरच्या जागेवर एका इमारतीचे बांधकाम सुरू होते. तिथे खरा, मोठ्ठा जेसीबी काम करत होता. तो माती उचलत होता, दगड बाजूला करत होता. दोघेही आश्चर्याने त्याच्याकडे पाहत राहिले. चैतन्य आनंदाने म्हणाला, चाचू, आम्हाला या मोठ्या जेसीबीवर बसायचं आहे! चिन्मय लगेच म्हणाला, आणि खूप फोटो काढायचे आहेत! त्यांच्या त्या निरागस इच्छेवर सगळेच हसले. चाचू प्रेमाने म्हणाले, नक्कीच, कधीतरी तुम्हाला खऱ्या जेसीबीवर बसवू आणि भरपूर फोटो काढू. हे ऐकताच दोघांच्या चेहऱ्यावर पुन्हा आनंद फुलला. आता त्यांच्या मनात एक नवे स्वप्न रंगू लागले होतेमोठ्या जेसीबीवर बसायचे आणि भरपूर फोटो काढायचे.

काही दिवसांनी त्यांची ती इच्छा खरोखरच पूर्ण झाली. एके दिवशी त्यांना खऱ्या जेसीबीजवळ घेऊन जाण्यात आले. समोर उभा असलेला तो मोठा पिवळा जेसीबी पाहताच दोघे आनंदाने उड्या मारू लागले.

आज आपण जेसीबीवर बसणार! चैतन्य आनंदाने ओरडला.

आणि खूप फोटो काढणार! चिन्मयने लगेच म्हटले.

दोघांना अलगद जेसीबीवर बसवण्यात आले. त्या उंच जागेवर बसल्यावर त्यांच्या चेहऱ्यावरचे हसू पाहण्यासारखे होते. कधी ते स्टेअरिंगला हात लावत होते, कधी मोठ्या चाकांकडे आश्चर्याने पाहत होते, तर कधी एकमेकांना म्हणत होते, पहा, आपण खरेखुरे जेसीबीवाले झालो!

फोटो काढताना तर त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. प्रत्येक फोटोसोबत त्यांच्या चेहऱ्यावर नवा उत्साह आणि नवे हास्य उमटत होते.

फोटो काढून झाल्यावर दोघांनी आनंदाने चाचूकडे पाहिले.

चैतन्य टाळ्या वाजवत म्हणाला, चाचू, किती मजा आली!

चिन्मय हसत म्हणाला, पुन्हा जेसीबीवर बसायचं!

दोघांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि डोळ्यांतील चमक पाहून चाचूही मनापासून आनंदी झाले. त्या क्षणी मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेले निरागस हास्यच त्यांच्यासाठी सर्वात मोठे बक्षीस होते. त्यांच्या आनंदात आणखी भर घालण्यासाठी चाचूंनी कपाटातून एक मोठा डबा काढला. त्यात दोन वेगळेच जेसीबी होते. ते साधे खेळणे नव्हते, तर डिसमेंटल होणारे जेसीबी होते. त्यासोबत छोटासा स्क्रूड्रायव्हर, पाना, टायर काढण्याची साधने आणि छोटे स्क्रू होते. दोघांनी आश्चर्याने ते पाहिले. हे काय आहे? चैतन्यने विचारले.

चाचू हसत म्हणाले, हा असा जेसीबी आहे की तुम्ही तो उघडू शकता आणि पुन्हा जोडूही शकता. बस! मग काय!

आता त्यांच्याकडे एक-दोन नव्हे, तर चार जेसीबी झाले होतेदोन आधीचे खेळण्यातले आणि दोन नवीन डिसमेंटल होणारे. चैतन्यने लगेच स्क्रूड्रायव्हर हातात घेतला आणि टायर काढायला सुरुवात केली. चिन्मय म्हणाला, मी पुन्हा लावतो! एकाने भाग काढला की दुसरा तो पुन्हा जोडायचा.

टायर निघाला! अरे, आता पुन्हा बसव! स्क्रू घट्ट कर! असे म्हणत दोघे घरभर खेळू लागले.

कधी ते स्वतःला मेकॅनिक समजत, कधी इंजिनिअर, तर कधी मोठ्या जेसीबीचे चालक.

संध्याकाळ झाली, पण त्यांचा खेळ काही संपत नव्हता. जेवतानाही त्यांच्या गप्पांचा विषय जेसीबीच होता आणि झोपतानाही त्यांनी जेसीबी जवळच ठेवले.

आजही ते फोटो पाहिले की त्या दिवसाचा निरागस आनंद, त्यांच्या डोळ्यांतील चमक, जेसीबीवर बसल्याचा अभिमान आणि चाचूसोबत घालवलेले ते सुंदर क्षण पुन्हा जिवंत होतात. हसू, आनंद, कुतूहल आणि कल्पनाशक्तीने भरलेली ही चैतन्यचिन्मय आणि चार जेसीबींची गोष्ट त्यांच्या बालपणातील एक सुंदर, अविस्मरणीय आठवण बनून राहिली.

संदेश : मुलांची स्वप्ने खूप छोटी असतात, पण त्यातून मिळणारा आनंद खूप मोठा असतो. त्यांच्या आवडी जपल्या, त्यांच्यासोबत वेळ घालवला आणि त्यांच्या छोट्या इच्छा पूर्ण केल्या, तर त्या क्षणांच्या आठवणी आयुष्यभर मनात फुलत राहतात.

# शब्दझुला



## जरा केलास उशीर

जरा केलास उशीर
आता होऊन अधीर
भरू देना दोन्ही तीर
बळीराजा येई धीर
शूर योध्यावानी मेघ
सनानाना बरसतो
थेंब बाणांचे तें वार
रोमरोमात मारतो
आठ महिन्यांची तूट
काढ आता रे भरून
सारे रानोमाळ आता
टाक पाण्याने माळून
रूप पालट मातीचे
पाळ वचन साथीचे
कर विधान तें खरे
भुई आकाश प्रीतीचे

– राजेश जाधव
मो.७९७२८७६२०६

## मृगनक्षत्रा लागले डोहाळे

अजूनही कसे आभाळ निळे ?
तिरीप उन्हाची सोसवेना बळे
सागरी लाटा उसळती खळे ...
पिऊनी सागरी जल आज
कृष्णमेघ चढले आभाळी ।
तहानेने व्याकूळ हो वसूधा
ओघळती घर्मधारा भाळी ...
रुसलास काय हो वरुणा
कृषवल भाकतसे ती करुणा ।
दावी अवडंबर कृष्णमेघ अंबरी
कोसळ कोसळ दरी डोंगरी ..
वारा मग आला धावूनी
झूलवित तरुवर पानोपानी ।
कृष्णमेघ अवतरला अवनी
नाचला मोरपिसारा फुलवूनी..
पानाआड गातयं कुणी
किलबिल पक्षी मंजूळ गाणी ।
नटली सृष्टी हिरवी पैठणी
खळखळ सरिता निर्मळ पाणी..
शिवार बघा वाऱ्यानं डोलतयं
फूलपाखरु फुलापरी बागडतयं!
इंद्रधनु क्षितीजा सप्तरंग उधळतयं
गिरीकंदरी पित पितांबर
शोभतोय

– अशोकधनु तोरवणे
(पुणे साक्री) मो.९३७३८३५८३७

## दिव्यत्वाची साक्ष

माहित नाही
तुझं माझं नातं काय
पण तुझा गंधस्पर्श
अंतरात दरवळतो आहे
सारं अव्यक्त
काहीच उमगत नाही
आतुरल्या मना
अनाकलनीय ओढ आहे
तुला कधीच
काहीही मागितलं नाही
पण नि:शब्दात
बकुळीची ओंजळ आहे
निरागस स्पंदनात
भावप्रीतीची गुणगुण आहे
अंतरी दिव्यत्वाची
अनाकलनीय साक्ष आहे

– वि.ग.सातपुते

## ये रे ये रे तू ये रे पावसा

ये रे ये रे ये ये रे पावसा
साऱ्या सृष्टीला तुझा भरोसा
ये रे ये रे ये ये रे पावसा
तू येताच हासती झाडे
आणि डुलतात बघ लाडे लाडे
कांती तेजाळे दिसते सतेज
दंबबिंदूंचा चढतो साज
बा रे रुसलास तू असा कसा
ये रे ये रे तू ये रे पावसा
तुझ्यामुळेच टरारे कोंभ
नको जाऊस तू असा लांब
तूच वैभव सृष्टीचे सारे
ये ना घेऊन सोबत वारे
झारी ओत ना तू भसा भसा
ये रे ये रे तू ये रे पावसा
हिरवाईची ती नवलाई
ये ना घेऊन तू लवलाही
पिके डोलू दे डोलू दे शिवार
हिरव्या शालूत टंच जवार
दान देऊन जा पसा पसा..
ये रे ये रे तू ये रे पावसा
तूच बरकत तूच पायली
सदा असू दे तुझी सावली
नको तापवू तू असे ऊन
सृष्टी निघाली बघ भाजून
मनमानी करतो असाकसा..
ये रे ये रे तू ये रे पावसा

प्रा.सौ.सुमती पवार,
नाशिक मो.९४६३६०५६४२

## माझा शेतकरी दादा

माझा शेतकरी दादा!
जगाचा हा पोशिंदा
शेती कसून राबून पिकवी
धनधान्य संपदा
असो ऊन वारा पाऊस,
झोकून देई स्वत:ला
त्याचे कष्ट वेदना अपार.
परी ना कदर जगाला,
जगाचा हा पोशिंदा,
राबराबतो राहून उपाशी ,
त्याच्या जीवावर कमविती
ते सदैव तुपाशी
रान मळ्याखळ्यात राबतो,
रात्रंदिन खाई खस्ता
त्याच्या कष्टाचा अन्
मालाचा भाव व लई सस्ता,
जरीपिकवी माणिक मोती,
त्याचे मोलभाव दुसरे हाती
तो मानितो हे देवाचं देणं आधी
वाटी इतरांना हातो हाती
जरी पडती कष्ट अपार,
त्याचाभरवसा भविष्यकाळ
शिकतील लेकरंबाळ,
फिटेल काळआशेचे हे बळ
असा माझा शेतकरी दादा
सदैव करी शेतीचा धंदा
कृषि पंढरीचा तो विठ्ठल
त्याला सदैव वंदा
जय जवान जय किसान,
शास्त्रीजींनी दिला मंत्र
आपण सारे होऊया कृषिराजाचे
भक्त नि मित्र

– अशोक पाटील
जयहिंद निवृत्त मुख्याध्यापक

## तळं आटलं आटलं

कधी नव्हे ते यंदाच,
गाव खचलं खचलं
मे महिन्याआधीच,
तळं आटलं आटलं...धृ
स्वार्थी ठेकेदारांनी,
सारं लुटलं लुटलं
माऊलीच्या ओंजळीचं,
पाणी शोषलं शोषलं..
एकेका भेगांमधून,
प्रश्न उठत राहिला
व्याकुळतेनं समदा,
गाव पोळत राहिला...
फक्त चमकोगिरीचा,
छंद बातमीदाराला
सत्य दडपावायचं,
मिरवायचं खोट्याला..
कुणावर जरासाही,
ना राहिला भरवसा
जो तो निवडून येता,
भरू लागतोय खिसा...
मोठ मोठ्या घोषणांचा,
किती मारायचा तीर
गाळामध्ये अडकला,
जुगारू वाचाळवीर...
एका एका घोटासाठी,
तरमळे मायबाप
अरे सांगा दलालांनो,
कुठं फेडाल हे पाप?...

– देवभाऊ उबाळे
कसारा, ता. शहापूर



## विठ्ठलाचे नाम

नाम घेता हरी हरी
रामाच्या प्रहरी
अवतरते दिव्य पंढरी
आपल्या घरी
नाम महिमा अगाध
वर्णावा किती
दूर जाते मनातील
अनामिक भीती
मनी येतात पुण्याच्या
आषाढ सरी
अवतरते दिव्य पंढरी
आपल्या घरी
अनंत तपाहून श्रेष्ठ
अमृतासम फळ
गोड नामाचा जिभेला
लागतो चळ
शुद्ध वैखरी होता
नूरतो कुणी अरी
अवतरते दिव्य पंढरी
आपल्या घरी
सुलभ अती ही
साधना विठ्ठलाची
धनधान्य नको
अगदी बिनखर्चाची
आप्पा म्हणे व्हावे
मोक्षाचे मानकरी
अवतरते दिव्य पंढरी
आपल्या घरी

– विलास कुलकर्णी, मीरा रोड
मो. ७५०६८४८६६४

# पावसाळ्यात वाढणारे सर्दी, खोकला, ताप आणि व्हायरल इन्फेक्शन




**डॉ.रोहन कुलकर्णी**
MBBS, MD Medicine, IDCCM
कन्सल्टिंग फिजिशियन, इंटेंसिविस्ट
जवाहर एसीपीएम मेडिकल हॉस्पिटल,
साक्री रोड, धुळे. मो.९५०३४२०५१२





**प्रस्तावना**

पावसाळा आला की वातावरणात थंडावा आणि ओलावा वाढतो. याच काळात सर्दी, खोकला, ताप, घसा खवखवणे, अंगदुखी आणि व्हायरल इन्फेक्शनची रुग्णसंख्या वाढताना दिसते. हे आजार बहुतेक वेळा सौम्य असतात; पण लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, गर्भवती महिला, दमा-COPD, मधुमेह किंवा हृदयरोग असलेल्या रुग्णांनी विशेष काळजी घेणे गरजेचे असते.

**कारणे**

पावसाळ्यात ओलसर हवामानामुळे विषाणूंना पसरण्यास अनुकूल वातावरण मिळते. गर्दीची ठिकाणे, शाळा, ऑफिस, बस-रेल्वे प्रवास, ओले कपडे, थंड पाणी, अपुरी झोप आणि कमी प्रतिकारशक्ती यामुळे संसर्ग लवकर होतो. सर्दी-खोकल्याचे विषाणू खोकताना, शिंकताना किंवा हातांनी नाक-तोंड-डोळे स्पर्श केल्याने पसरतात. हात धुणे आणि खोकताना तोंड झाकणे हे श्वसनविकारांचे जंतू पसरणे कमी करण्यासाठी महत्त्वाचे उपाय आहेत.

**परिणाम**

सामान्य व्हायरल इन्फेक्शनमध्ये नाक वाहणे, नाक बंद होणे, घसा दुखणे, खोकला, सौम्य ताप, डोकेदुखी आणि अंगदुखी अशी लक्षणे दिसतात. बहुतेक रुग्ण ३ ते ७ दिवसांत बरे होतात. पण काही रुग्णांमध्ये खोकला जास्त दिवस राहू शकतो. ज्येष्ठ नागरिक, लहान मुले किंवा आधीपासून आजार असलेल्या व्यक्तींमध्ये श्वास लागणे, छातीत घरघर, न्यूमोनिया किंवा ऑक्सिजन कमी होण्याचा धोका वाढू शकतो. फ्लूच्या गंभीर गुंतागुंतीचा धोका काही गटांमध्ये अधिक असतो आणि अशा रुग्णांनी लवकर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

**उपचार**

व्हायरल सर्दी-खोकल्यात सर्वात महत्त्वाचे उपचार म्हणजे विश्रांती, पुरेसे पाणी, गरम पाण्याच्या गुळण्या, वाफ, हलका आहार आणि ताप असल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने औषध. स्वतःहून अँटिबायोटिक घेऊ नये. कारण सर्दी बहुतांश वेळा व्हायरसमुळे होते आणि अँटिबायोटिक व्हायरसवर काम करत नाहीत. CDC नुसार common cold मध्ये अँटिबायोटिक उपयोगी नसतात.

ताप ३ दिवसांपेक्षा जास्त राहणे, श्वास लागणे, छातीत दुखणे, सतत उलट्या, खूप अशक्तपणा, ऑक्सिजन कमी होणे, रक्ताळलेला कफ किंवा लहान मुलांमध्ये सुस्ती दिसल्यास त्वरित डॉक्टरांकडे जावे.

**प्रतिबंधक उपाय**

१.हात साबणाने वारंवार धुवा.
२.खोकताना किंवा शिंकताना रुमाल/कोपर वापरा.
३.आजारी व्यक्तीपासून थोडे अंतर ठेवा.
४.ओले कपडे लगेच बदला.
५.घरात हवा खेळती ठेवा.
६.पुरेशी झोप घ्या आणि पौष्टिक आहार घ्या.
७.गर्दीत मास्क वापरणे फायदेशीर ठरू शकते.
८.फ्लू लसीकरणाबाबत डॉक्टरांचा सल्ला घ्या, विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि दीर्घकालीन आजार असलेल्यांनी. Seasonal influenza vaccine हा influenza पासून बचावाचा प्रभावी मार्ग मानला जातो आणि वार्षिक लसीकरणाची शिफारस केली जाते.

**सामाजिक परिणाम**

सर्दी, फ्लू आणि इतर व्हायरल श्वसनविकारांमुळे जगभरात शाळा, ऑफिस, रुग्णालये आणि आरोग्य व्यवस्थेवर मोठा ताण येतो. अनेक लोक कामावर जाऊ शकत नाहीत, मुलांचे शाळेचे दिवस बुडतात आणि वृद्ध किंवा आजारी व्यक्तींमध्ये हॉस्पिटलायझेशनची गरज लागू शकते. त्यामुळे हा फक्त साधा सर्दी-खोकला नसून समाजाच्या आरोग्य आणि अर्थव्यवस्थेवर परिणाम करणारा विषय आहे.

**निष्कर्ष**

पावसाळ्यातील सर्दी, खोकला, ताप आणि व्हायरल इन्फेक्शन टाळण्यासाठी स्वच्छता, योग्य आहार, पुरेशी झोप आणि वेळेवर उपचार हीच खरी गुरुकिल्ली आहे. स्वतःहून औषधे घेऊ नका, अँटिबायोटिकचा गैरवापर टाळा आणि धोक्याची लक्षणे दिसली तर डॉक्टरांचा सल्ला घ्या. योग्य काळजी घेतली तर पावसाळा आनंदी आणि निरोगी जाऊ शकतो.

# आदर्श ध्येयवाद

(पान ३ वरुन) हिंमत, धैर्य व अस्मिता प्रज्वलित केली आणि त्यांचे उदात्तीकरण करून त्यांना उच्च पदावर नेऊन पोहोचवले.

संपूर्ण भारतभर स्वराज्याचा विस्तार करणे व दिल्लीवर भगवा झेंडा फडकावणे हे छत्रपतींचे अंतिम ध्येय होते. संपूर्ण भारत मुक्त करून गोर गरीब जनतेचे स्वराज्य उभा करणे हा त्यांचा मनोसंकल्प व ध्येयवाद होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेली शक्ती एवढी चिरस्थायी होती की इंग्रजाविरूध्द झालेल्या १८५७ च्या उठावामध्ये भारतीय सैन्याची प्रेरणा छत्रपती शिवाजी महाराजच होते. छत्रपती शिवाजी महाराज प्रयतक्वादी होते. निराशवादी नव्हते. नेताजी सुभाषचंद्र बोस निराश होऊन ब्रिटीशांच्या नजर कैदेत बसले असताना त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र वाचले. छत्रपतींनी औरंगजेबाच्या कैद्येतुन आग्रा शहरातुन करून घेतलेली सुटका हे प्रकरण त्यांना खुप भावले. यातुन प्रेरणा घेऊन नेताजी सुभाषचंद्र बोस वेशांतर करून निसटले व आझाद हिंद सेनेच्या माध्यमातुन आयुष्यभर भारत देश स्वतंत्र करण्यासाठी झगडत राहिले.क्रांतिकारकांचा महामेरू सरदार भगतसिंग यांनी किल्ले रायगडावरती येऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीचे दर्शन घेऊन स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला व देशासाठी हुतात्म्ये स्विकारले.

सेतू माधवराव पगडी म्हणतात, छत्रपती शिवाजी महाराजांनी आम्हाला अन्यायाविरूध्द झगडण्यास शिकविले, कधीही निराश न होण्यास शिकवले, त्यांच्यामुळे भारतीय अस्मिता जागृत झाली आणि आमच्या पाठीचा कणा ताढ झाला.शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार म्हणतात, अंगी उपजत नेतृत्व गुण असणा-या राष्ट्रनिर्मात्या छत्रपती शिवाजी राजांच्या कर्तृत्वाची वीज देशाच्या राजकीय क्षितिजावर कडाडली आणि सर्वसमावेशक मराठा राज्याचा नजरेत भरण्याजोगा जो उदय आणि विकास झाला, तो खरोखरच चकित करणारा ठरला, यात शंका नाही.

छत्रपती शिवाजी महाराज आदर्श मानुन विसाव्याशतकात हिंदुस्थानमध्ये स्वातंत्र्यलढ्याला त्यागाच्या पर्वताची रांगच उभी राहिली. भगतसिंग, सुखदेव, राजगुरू, मदनलाल धिंग्रा हे हसत हसत भारतमातेच्या वेलीवर शहीद झाले.त्यांचे आदर्श होते छत्रपती शिवाजी महाराज.आजही मानवाला प्रत्येक कृती करण्याची प्रेरणा छत्रपती शिवाजी महाराजांकडून मिळते.त्यांनी उच्चतम तत्वांचा डोंगरच आपल्या समोर ठेवला आहे. छत्रपतींचे ध्येय नेहमी जगाला मार्गदर्शक ठरत आहे.पृथ्वीवरील सर्व मानव जात छत्रपतींच्या विचाराने पुढे गेली तर जीवनामध्ये यश आणि यशच.छत्रपती शिवाजी महाराज आपल्याला ध्रुवता-याप्रमाणे कायम मार्गदर्शक ठरत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज हेच आपल्या सर्वांचे ध्येयवाक्य आहेत.

# खानदेशातील समाज सुधारक आणि समाजसेवक

(पान ५ वरुन) विद्यार्थी वसतिगृहाची दोंडाईचे येथील व्यवस्था अण्णासाहेबांकडे सोपविण्यात आली. बहुजन समाजाच्या मुलांच्या शिक्षणासाठी त्यांची धडपड राहिली. हिंदी समाजाच्या मुलांच्या शिक्षणासाठी त्यांची धडपड राहिली. हिंदी भाषा शिक्षण, साक्षरता प्रसारासाठी गावोगावी हिंडून शिक्षणाचे महत्त्व पटविले. प. खानदेशातील अस्पृश्यता निवारण कार्यातील सुधारणावाद्यांशी त्यांचा संबंध आला. महार, भंगी, चांभार, भोई यांच्या कल्याणासाठी संस्थांची उभारणी केली. 'प. खानदेश भंगी सेवा समाज संस्था' ही त्यापैकी एक होय. भंगी डोक्यावरून मैला वाहण्याच्या अमानदी, प्रथेतून मुक्ती आणि त्यांना प्रतिष्ठेचे जीवन कसे जगता यावे याचा विचार अण्णासाहेब करीत सहभोजन कार्यक्रम, मंदिर प्रवेश सत्याग्रह सामाजिक विषमते विरुद्ध लढा, हरिजन नवाह अशा उपक्रमातून अण्णांनी अस्पृश्योद्धार कार्य चालविले.हिंदू-मुस्लीम ऐक्यावर श्रद्धा ठेवून गुन्हेगार ठरविलेल्या जातींसाठी उन्नतीच्या योजना 'कंजर सेवा मंडळाची स्थापना', धनगर समाजात जागृती, स्त्रियांचे केशवपन, अंधश्रद्धा आणि अनिष्ठ प्रथा, पद्धतीविरुद्ध जागृती घडवून आणण्याचे कार्य अण्णांनी केले. शेतकरी भूमीहीनांच्या प्रश्नांवर मार्गदर्शन करून निस्वार्थ भावनेने समाजसेवेचे व्रत अण्णांनी अंगी बाणले. स्वातंत्र्याबरोबरच सुराज्य आणायचे असल्यास समाजसेवेतनच ते प्राप्त करता येईल. यावर त्यांचा विश्वास होता. म्हणूनच राजकीय सत्तेच्या साठमारीत त्यांनी लक्ष घातले नाही. 'सेवा' हाच धर्म मानून अण्णांनी मानवतेवर श्रद्धा ठेवली. अण्णासाहेब जीवनाच्या शेवटपर्यंत समाजाची सेवा करीत राहिले.

# गिफ्ट घेण्यापूर्वी जाणून घ्या आयकर कायद्याच्या तरतुदी

(पान ५ वरुन) उदाहरण ६- अनिल ने सुनीलला एक लाख रुपये बाजार किंमत असलेला मोबाईल फोन गिफ्ट दिला या उदाहरणात सुनीलला टॅक्स लागणार नाही कारण जंगम मालमत्तेच्या बाबतीत काही विशिष्ट मालमत्ताच भांडवली जंगम मालमत्तेत येतात. आणि त्या गिफ्ट दिल्या तरच टॅक्स लागत असतो त्याच्या व्यतिरिक्त इतर कोणतीही मालमत्ता गिफ्ट म्हणून दिली तर तिला टॅक्स भरावा लागत नाही. कारण आयकर कायद्यानुसार इतर वैयक्तिक वापराच्या वस्तू त्यांचा विशिष्ट जंगम मालमत्ता व्याख्येमध्ये समावेश नाही.

उदाहरण ७- अनिल ने सुनील ला ६०००० रुपये किंमत असलेला सोन्याचा किंवा चांदीचा दागिना गिफ्ट दिला या उदाहरणात सुनीलला ६०००० रुपये किमतीवर इतर उत्पन्नच्या शीर्षकांतर्गत टॅक्स भरावा लागेल. कारण दागिने हे जंगम मालमत्तेच्या संज्ञा मध्ये समाविष्ट होत असतात म्हणून त्यावर टॅक्स आकारला जातो.

उदाहरण ८- मुलाला आई-वडील किंवा आजी आजोबांची मालमत्ता जसे घर, गाडी दागिने व काही रोख रक्कम वारस हक्काने मिळाली या वर देखील मुलाला टॅक्स भरावा लागणार नाही कारण आयकर कायद्याच्या तरतुदीनुसार वारास हक्काने मिळालेल्या मालमत्तेवर व रकमेवर टॅक्स भरावा लागत नाही. वरील सर्व उदाहरणांमध्ये ज्या मिळालेल्या गिफ्ट वर आयकर कायद्यानुसार टॅक्स लागत नाही. परंतु त्या मिळालेल्या सर्व गिफ्ट चा तपशील आयकर विवरण पत्रकात करदात्यास भांडवली प्राप्ती या करमुक्त उत्पन्न रकान्यामध्ये द्यावा लागतो.



सुमेध रानडे
मो.९५६१०९३७४०

# राशी भविष्य

**मेष:** हा सप्ताह तुमच्यासाठी काही अडथळे आणि अडचणी घेऊन येत आहे. हव्या तशा वेगाने कामे पुढे सरकणार नाहीत. अडकलेली कामे तशीच राहण्याची शक्यता आहे. पण असं असूनही तुम्हाला त्याचा फार त्रास होणार नाही. तुम्ही तुमच्या कामावर लक्ष केंद्रित करुन चांगल्या पद्धतीने पुढे जाऊ शकणार आहात. या आठवड्यात तुम्ही एक नवीन दृष्टिकोन ठेवण्याची गरज आहे. आलेली अवघड परिस्थिती तुम्हाला नक्की शिकवायला आणि समृद्ध करायला आली आहे असा सकारात्मक विचार ठेवून उत्तर शोधण्याचा प्रयतक करा. तुम्हाला नक्कीच यश येईल. संयम आणि धैर्य ठेवा.

**वृषभ:** हा सप्ताह तुमच्यासाठी धैर्य आणि संयमाचा कस लावणारा असणार आहे. तुमच्यातील चांगुलपणाची एक प्रकारे परीक्षा होईल. पण तुम्ही जर या परीक्षेत उत्तीर्ण झाला तर पुढचा मार्ग निश्चितच सोपा होईल. काहीतरी मिळवायला वाट बघावी लागेल. या आठवड्यात तुम्ही नियमसंयम ठेवून वागलात तर तुम्हाला तुमच्या अपेक्षित ध्येयापर्यंत पोचणे सोपे जाईल. राग लोभ मत्सर अशा तमोगुण प्रधान वृत्तीवर शुद्ध सात्विक शांत भावनेने मात करा. सौम्य शांततेचा मार्ग निवडणे म्हणजे सुध्दा एक प्रकारचे धाडसाचे काम आहे हे विसरु नका.

**मिथुन:** हा सप्ताह तुमच्यासाठी निवांत वेळ घेऊन येत आहे. तुमच्या आवडीचं काहीतरी करु शकाल. एखादा आनंदाचा कार्यक्रम होईल. मागे केलेल्या कष्टाचे फळ काही प्रमाणात मिळेल. लहानसा उत्सव साजरा कराल. समारंभामध्ये सहभागी व्हाल किंवा तुम्ही स्वतः तुमच्या आवडीच्या लोकांशी भेटी होतील. एकमेकांना सहाय्य कराल. तब्येत सुधारेल. या आठवडयात तुम्ही एकटे राहू नका, लोकांना भेटायला जा. मन मोकळे हसा आणि मन मोकळे बोला. लोकांचे मत जाणून घ्या, त्यांना बोलतं करा. तुमच्या जवळच्या माणसांशी आवर्जून संवाद साधा. स्वार्थबुद्धी सोडा.

**कर्क:** हा सप्ताह तुमच्यासाठी भावनांचे प्राधान्य घेऊन येत आहे. घरात किंवा नोकरीमध्ये लोकांचा प्रभाव राहील. समजून घेणारे लोक भेटतील. तुमच्या कलेला वाव मिळेल. काही प्रमाणात राजकारण घडू शकतं. कामामध्ये एक प्रकारचा टप्पा गाठला जाईल. या आठवड्यात तुम्हाला तुमचं वागणं बोलणं चांगलं आणि सुसंस्कृत ठेवण्याची गरज आहे. ऐकावं जनाचं करावं मनाचं, याप्रमाणे वागा. मोठ्यांसमोर नमतं घ्या. कोणालाही हिणवू नका. कोणा अनुभवी व्यक्तीचा सल्ला घेऊन मग निर्णय घ्या. तुमच्या जवळच्या व्यक्तींची चांगली काळजी घ्या!




**सिंह:** हा सप्ताह तुमच्यासाठी नवीन ऊर्जा घेऊन येत आहे. तुमच्यातील जिद्द, धाडस, काहीतरी करून दाखवण्याची वृत्ती, या सगळ्यांचा उपयोग करुन तुम्हाला हवं असलेलं काहीतरी मिळण्याची शक्यता आहे. सकारात्मक घटना घडतील. इतरांकडून मान सन्मान आणि सहकार्य मिळेल. लोकांना तुमचा सहवास आवडेल. या आठवड्यात तुम्ही काहीही झालं तरी खचून जाऊ नका. सकारात्मक दृष्टिकोन ठेवा. लढण्याची वृत्ती ठेवा पण कोणाशी विनाकारण भांडू नका. आत्मविश्वास, प्रसंगावधान आणि खेळाडू वृत्ती ठेवा. चांगले नेतृत्व करा.

**कन्या:** हा सप्ताह तुमच्यासाठी एक नवीन सुरुवात घेऊन येत आहे. कामामध्ये संथ पण आश्वासक अशी वाटचाल होईल. आर्थिक दृष्ट्या हा काळ तुमच्यासाठी सकारात्मक आहे. समाधानकारक उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. कुटुंबात, आरोग्यात, कामात स्थैर्य लाभेल. या आठवड्यात तुम्ही काहीतरी नवीन शिकण्यासाठी तयार रहा. येणाऱ्या संधीचे सोने करुन घ्या. मुंगी होऊन साखर खाऊन घ्या. आर्थिक गुंतवणूक विश्वासार्ह ठिकाणी करु शकता. लहान गोष्टींमध्ये आनंद माना. आकाशात उडायचे असेल तर आधी पाय जमिनीवर ठेवावे लागतात हे विसरु नका.

**तूळ:** हा सप्ताह तुम्हाला बुद्धीचातुर्य दाखवण्याचे प्रसंग घेऊन येत आहे. महत्वाचे संवाद घडतील. दुसऱ्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यापेक्षा नियम आणि कर्तव्य यांना प्राधान्य द्यावं लागेल. काही प्रमाणात वाद संभवतात. कामामध्ये नियोजनाचा एक टप्पा गाठला जाईल! पण हे सगळं करताना कुठेतरी एकटे पडल्यासारखं वाटेल! या आठवड्यात तुम्हाला तुमचं बोलणं, एकदम स्पष्ट ठेवण्याची गरज आहे. जे बोलाल ते आत्मविश्वासाने बोला आणि तसं वागा. संशयाला, खोट्याला अजिबात जागा ठेवू नका. पक्षपात करू नका. अनुभवी व्यक्तीचा सल्ला घेऊन मग निर्णय घ्या. न्याय आणि नीतीने वागा.

**वृश्चिक:** हा सप्ताह तुमच्यासाठी नवीन उमेद घेऊन येत आहे. मागचं विसरून नवीन सुरुवात करण्यासाठी तयार रहा. एक प्रसन्न आणि उत्साहवर्धक घटना घडू शकते. चांगला सकारात्मक बदल घडू शकतो. तुमचा आत्मविश्वास वाढेल. नवीन संकल्पना सुचतील. नवीन बदल घडतील. या आठवड्यात तुमच्या मनात सुरू असलेले विचार आणि कल्पना लोकांपर्यंत पोचवा. सृजनशीलता बाळगा, वेगळ्या पद्धतीने काम करा. बदल घडत असतील तर ते स्वीकारा. आळस सोडलात तर उन्नती होईलच. केल्यानेच होत आहे आधी केलेची पाहिजे! हे लक्षात ठेवा!

**धनू:** हा सप्ताह तुमच्यासाठी उर्जायुक्त असणार आहे. तुम्ही तुमच्या ध्येयपूर्तीसाठी एक पाऊल पुढे टाकू शकणार आहात. झटपट घडामोडी घडू शकतात. तुमच्या नोकरीत, व्यवसायात किंवा घरातील आवडीच्या कामात एक प्रकारे नवीन चांगली चालना मिळेल. अडथळे येतील पण त्यावर तुम्ही कुशलतेने मात करू शकाल. काही प्रवास घडू शकतात त्यातून तुम्हाला आनंद होईल. या आठवड्यात तुम्ही तुम्हाला जे साध्य करायचं आहे त्यावर एकाग्रपणे काम करा. लक्ष विचलित होऊ देऊ नका. इतरांना देखील घेऊन पुढे चाला. आळस अजिबात नको.

**मकर:** हा सप्ताह तुमच्यासाठी परीक्षेचा असणार आहे. तुमचा संयम, तुमचा सात्विक भाव आणि तुमची सचोटी या गोष्टींना धक्का लागण्याचे प्रसंग येऊ शकतात. कामे रखडली जातील. काही प्रमाणात हतबल झाल्यासारखं वाटू शकतं. या आठवड्यात तुम्ही स्वतःला कणखर बनवण्याची गरज आहे. कुठल्याही आमिषाला भुलू नका. लाचारी पत्करू नका. सात्विक मनाला योग्य वाटत नसेल ते काम अजिबात करू नका. कोणतेही नियम मोडू नका. जोखीम उचलू नका. व्यसनात गुंतू नका. अती तिथे माती हे लक्षात ठेवा! आत्मसंयम ठेवा!

**कुंभ:** हा सप्ताह तुमच्यासाठी, तुम्ही आहात त्या मार्गावर पुढे नेणारा असणार आहे. बुध्दीपेक्षा भावनांचा पगडा राहील. मध्यम गतीने कामे पुढे सरकतील. लोकांचे सहकार्य लाभेल. प्रवसायोग संभवतात. नातेसंबंध जोडले जातील. तुम्हाला आतून प्रसन्न वाटेल, दुसऱ्यांना तुम्ही आनंद देऊ शकाल. एखादा छंद किंवा कला यातून तुम्हाला समाधान मिळेल. या आठवड्यात इतरांना तुमच्या बरोबर घेऊन चाला. तुम्हाला कृतीशील होण्याची गरज आहे. तुमच्यातील चांगुलपणाने लोकांचे मन जिंका. पण कोणाच्या कुठल्याही आमिषाला भुलू नका.

**मीन:** हा सप्ताह तुमच्यासाठी भौतिक आणि आर्थिक जडणघडणीचा असणार आहे. इतरांच्या मदतीने निश्चितच एक टप्पा गाठला जाईल. प्रयतकांना यश येईल. तुम्ही केलेल्या कामाला ओळख मिळेल. घर, जमीन, गाडी, नोकरी, व्यवसाय किंवा इतर व्यावहारिक गोष्टींमध्ये चांगली प्रगती होईल. या आठवड्यात तुम्ही कामामध्ये परिपूर्णता आणायचा प्रयतक करा. इतरांच्या मदतीने, सोबतीने पुढे चाला. दिलेल्या सूचना अंमलात आणा. इतरांना तुम्ही देखील मदत करा. एकट्या पेक्षा मिळून मिसळून काम करा. एकीचे बळ लक्षात ठेवा!

## पान १ वरुन

### दोंडाईचामधील अमरावती नदीवरील आर्च पुल

नगरसेवक प्रवीण महाजन, जितेंद्र गिरासे, कृष्णा नगराळे, हितेंद्र महाले, नरेंद्र गिरासे, चिरंजीव चौधरी, राकेश अग्रवाल, भरतरी ठाकूर, छोटू सोनवणे, संजोग रामोळे, अक्षय चव्हाण, भैय्या धनगर, चतुर पाटील, रामकृष्ण मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान अमरावती नदीवरील या पुलासाठी लंडनमधील पुलाच्या धर्तीवर इलेवेशन डिझाईन वापरून त्याला संपूर्ण हेरिटेज लुक देण्यात येणार असल्याने, येत्या वर्षभरात हा पूल शहराच्या सौंदर्यात भर घालणारा ठरणार आहे. तसेच, काम ३१ मार्चपर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

बैठकी प्रसंगी वन विभागाशी संबंधित विषयांवरही चर्चा झाली. मालपुर रोडवरील वन विभागाच्या १९ एकर जागेत नगरपालिकेमार्फत मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्याचे निर्देश देण्यात आले. दोंडाईचा येथे सामाजिक संस्थांच्या सहकार्याने उभारण्यात आलेल्या ऑक्सिजन पार्कच्या धर्तीवर या जागेचा विकास करण्याबाबतही सूचना करण्यात आल्या. यासाठी उपवनसंरक्षकांनी संबंधित जागेबाबत सामंजस्य करार करावा, तसेच त्या जागेचे वनात रूपांतर करण्याची जबाबदारी नगरपालिकेवर असेल, असे मंत्री रावल यांनी स्पष्ट केले.

यावेळी शहरातील पावसाच्या पाण्याचा निचरा सुरळीत व्हावा यासाठी स्ट्रॉम वॉटर ड्रेनेज प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले. या योजनेअंतर्गत शहराचे सहा झोन करण्यात आले असून, अमरावती, भोगावती व कनोरी नाल्यासह विविध नदी-नाल्यांचा समावेश करण्यात आला आहे. याशिवाय भूमिगत गटार योजना व सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (ट्रीटमेंट प्लॅन) यांचाही आढावा घेण्यात आला.

एकूणच, दोंडाईचा शहराच्या पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी आणि पर्यावरणपूरक विकास साधण्यासाठी विविध महत्त्वपूर्ण निर्णय या बैठकीत घेण्यात आले.

### मंदिरात गैरव्यवहार नाना पटोलेंची टीका

भाजप यात सामील आहे, हे आता स्पष्ट झाले आहे. देणगीचे पैसे लुटणे आणि लोकांच्या भावनांशी खेळणे हाच भाजप आणि आरएसएसचा मूळ हेतू आहे. त्यामुळे या सर्वांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. त्यांनी देशातील जनतेची आणि सनातन धर्माची माफी मागितली पाहिजे, पण ते तसे करणार नाहीत.आरएसएस म्हणजे केवळ सत्य लपवण्याची यंत्रणा या प्रकरणाच्या चौकशीसाठी नेमण्यात आलेल्या विशेष तपास पथकावर अविश्वास दाखवत पटोले यांनी सरकारवर कडाडून टीका केली. आरएसएस ही केवळ सर्व सत्य लपवण्यासाठी बनवलेली त्यांचीच एक सिस्टीम आहे. यातून ते कोणालातरी बळीचा बकरा बनवतील आणि मुख्य सूत्रधार मात्र यातून सहीसलामत बाहेर राहतील. त्यामुळे सनातन भावनांशी खेळणाऱ्या भाजप आणि आरएसएसवर थेट कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

**सिद्धिविनायक, पंढरपुरातही लूट**

बद्रीनाथ-केदारनाथ धाममधील देणग्या आणि प्रसादातील कथित गैरव्यवहाराबाबत विचारले असता, नाना पटोले यांनी महाराष्ट्रातील मंदिरांचाही दाखला दिला. हे केवळ बद्रीनाथमध्येच घडले नाही, तर महाराष्ट्रातील सिद्धिविनायक आणि पंढरपूरमध्येही हेच झाले आहे. या सर्व ठिकाणी त्यांनी देणगीचे पैसे लुटले आहेत. पण प्रभू श्रीराम त्यांना अजिबात सोडणार नाहीत, देव त्यांना त्यांची योग्य जागा नक्की दाखवून देईल, असा घणाघात नाना पटोले यांनी केला.

### राज्यात मुसळधार पावसामुळे आपत्कालीन यंत्रणा

आला तर तो टाळला पाहिजे. जेणेकरून आता ज्या प्रकारे पाऊस आणि ज्या प्रकारच वादळ आहे, त्याच्यामुळे काही अपघात त्या ठिकाणी होऊ नयेत, या दृष्टीने त्याचा देखील अलर्ट आपण दिलेला आहे. एनडीआरएफ, एसडीआरएफ आणि आपत्ती व्यवस्थापन कक्ष प्रत्येक गोष्टीवर नजर ठेवून आहे. ज्या-ज्या ठिकाणी अडचणी तयार होत आहेत, त्या-त्या ठिकाणी अडचणी दूर करण्याचा प्रयतक चाललेला आहे. फक्त माझी विनंती आहे की, यावेळी आपण नीट अलर्ट सगळ्यांना देत आहोत. लोकांनी ते अलर्ट्स फॉलो करावेत आणि शक्यतो त्या अलर्ट्स प्रमाणेच आपण त्या ठिकाणी बाहेर पडावं, अशा प्रकारची विनंती देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

### शुभांगी पाटील यांना कोणी विचारे ना!

फक्त पक्षप्रवेश करत आहात का, एवढंच विचारलं. बाकी काहीच नाही. माझ्यावर अनेक शिक्षकांच्या मागण्यांची, हक्काची जबाबदारी आहे. ती पूर्ण करण्यासाठी मी शिवसेनेत प्रवेश केला.

गेल्या १०-१२ वर्षांपासून शुभांगी पाटील या शिक्षकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम करत आहेत. शिक्षकांच्या विविध मागण्यांसाठी त्यांनी अनेक आंदोलने केली असून आझाद मैदानावर उपोषणही केलं होतं. त्यांच्या या निर्णयामुळे ठाकरे गटातील अस्वस्थता आणखी वाढल्याची चर्चा आता राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

### विमा कंपनीच्या फसवणूक डाव

मालकीची आणि आय.सी.आय.सी.आय. लोम्बार्ड कंपनीचा विमा असलेली मारुती अल्टो कार क्र. एमएच३९/डी-२१८९ या गुन्ह्यात जाणीवपूर्वक प्लॅन केली. या खोट्या अपघाताच्या जोरावर नातेवाईकांनी मोटार अपघात दावा प्राधिकरण, धुळे येथे विमा कंपनीकडून ४०-४० लाख रुपयांची नुकसान भरपाई मिळण्यासाठी दोन पिटीशन दाखल केल्या.न्यायालयाकडून कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची सखोल पडताळणी केली. त्यांनी धुळे सिव्हील हॉस्पिटल, सेवा हॉस्पिटल आणि मुंबईच्या जे.जे. हॉस्पिटलमधील वैद्यकीय नोंदी (एमएलसी) तपासल्या असता, सुरुवातीला अपघात दुचाकींमध्येच झाल्याचे स्पष्ट नमूद होते. साक्षीदार, गाडी मालक आणि फिर्यादी हे सर्व एकाच गावचे व जवळचे नातेवाईक असून त्यांनी पोलीस यंत्रणा, न्यायालय आणि विमा कंपनीची फसवणूक करण्यासाठी हा बनाव रचल्याचे चौकशीत निष्पन्न झाले.विमा कंपनीच्या वतीने देण्यात आलेल्या अधिकृत तक्रारीवरून धुळे तालुका पोलीस ठाण्यात लक्ष्मण साहेबराव पाटील (फिर्यादी), सुरेखाबाई संदीप पाटील (मयताची पतकी),छोटू उत्तम पाटील (गाडी मालक/शालक, रा. सोनगीर), पुंजाराम राजाराम पाटील (साक्षीदार),इरफानखान सलिमखान (कार चालक, रा. देवपूर, धुळे)यांच्यासह इतरांविरोधात भारतीय दंड संहिता कलम ४२० (फसवणूक) आणि १२० ब (गुन्हेगारी कट रचणे) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी विमा कंपनीचे विभागीय व्यवस्थापक प्रथमेश भगत,तपासणी अधिकारी सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक अशोक पाटील यांनी या प्रकरणाचा सखोल तपास केला.या प्रकरणाचा पुढील तपास धुळे तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक प्रशांत जयसिंग राठोड करत आहेत.

### शहर पोलीसांनी दोघा सराईत चोरांना पकडले

गुन्हा दाखल झाला. पोलीस निरीक्षक हेमंत भामरे यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार पोलिसांनी संशयित सज्जाद अहमद सलीम अहमद, (वय ३३), अब्दुल रहमान कलीम अहमद (वय २४, दोघे रा. रमजानपुरा, मालेगाव जि. नाशिक) या दोघांना श्री भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे येथे संशयास्पदरित्या फिरतांना ताब्यात घेतले. त्यांची कसून चौकशी केली असता त्यांनी वरील गुन्हयाची कबुली दिली. धुळे शहरातुन यापुर्वी वेगवेगळया ठिकाणाहुन चोरी केलेले नऊ चोरीचे मोबाईल पोलिसांनी हस्तगत केले. त्यांची किंमत १ लाख ४१ हजार ५०० रुपये आहे. उर्वरीत मोबाईल चोरीचे गुन्हयांची फिर्यादी यांची माहिती घेण्यात येत आहे. पोलीस अधीक्षक धुळे विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे, उपअधीक्षक राजकुमार उपासे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हेमंत भामरे, उपनिरीक्षक नितिन चौधरी, हवालदार रविकिरण राठोड, कुंदन पटाईत, महेश मोरे, अमित रनमळे, तुषार पारधी, अमोल पगारे, रोहिणी पवार, सुदर्शन मोरे, प्रशांत नाथजोगी, धम्मपाल वाघ, दिपक जगताप यांनी कारवाई केली.

## पान १ वरुन

### पाणी जमीनीत मुरवा व जलसमृध्द व्हा

पाणीटंचाईसाठी ओळखला जातो. त्यामुळे रेन वॉटर हार्वेस्टिंग ही केवळ कायदेशीर आवश्यकता नसून भविष्यातील जलसुरक्षेची प्रभावी गुरुकिल्ली आहे असा ठाम संदेश या सेमिनारमधून देण्यात आला. वाढते शहरीकरण, घटणारी भूजल पातळी आणि भविष्यातील पाण्याची वाढती गरज लक्षात घेता प्रत्येक निवासी, व्यावसायिक व औद्योगिक प्रकल्पामध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करणे अत्यंत आवश्यक असल्याचे मान्यवरांनी प्रतिपादन केले.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे भटू पवार नगररचनाकार, धुळे यांनी महाराष्ट्र शासनाच्या नियमांनुसार रेन वॉटर हार्वेस्टिंगचे महत्त्व स्पष्ट करताना प्रत्येक नवीन बांधकामामध्ये त्याची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रमुख प्रायोजक फुराट कंपनीचे संचालक इब्राहीम खान सुरत यांनी आधुनिक रेन वॉटर हार्वेस्टिंग तंत्रज्ञान, त्याचे दीर्घकालीन फायदे आणि जलसंवर्धनासाठी उद्योग क्षेत्राची सामाजिक जबाबदारी याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अक्षय पी. मुंडके अध्यक्ष बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया धुळे शाखा होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात धुळे सेंटरच्या माध्यमातून जलसंवर्धनाबाबत जनजागृती वाढविण्यासाठी अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येईल, असे सांगून प्रत्येक सदस्याने आपल्या प्रकल्पात रेन वॉटर हार्वेस्टिंगला प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन आनंद बाळापुरकर सचिव, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया धुळे यांनी केले. यावेळी माजी अध्यक्ष सुनील मुंदडा, कुणाल सोनार, माजी आशिष अग्रवाल, दिपक शेलार, संदीप सैन्दाणे शेषराज जाधव, समीर बहाळकर, मनपा अभियंता प्रकाश सोनवणे, इंजी. कमलेश सोनवणे, धनंजय अहिरे, मोहिनीस पाटील, हेमराज कोते, यतीन सर, तसेच बिल्डर्स असोसिएशन धुळे शाखेचे सर्व पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी फुराट कंपनीचे मोलाचे सहकार्य लाभले. कंपनीचे संचालक इब्राहीम खान यांचे बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया धुळे शाखेच्या वतीने विशेष आभार व्यक्त करण्यात आले. रेन वॉटर हार्वेस्टिंग करून घेण्यासाठी मोफत मार्गदर्शन धुळे शाखे द्वारा करण्यात येणार आहे त्यासाठी संपर्क ९३५९३९१४०० क्रमांक देण्यात आला आहे.

### कलेक्टरकडून सखोल पुनरिक्षणाच्या कामाची पाहणी

संभाजी पाटील, तसेच ब्लॉक लेव्हल अधिकारी श्री. गिते यांच्यासह निवडणूक विभागातील संबंधित महसूल कर्मचारी आणि पर्यवेक्षक उपस्थित होते. उपस्थित अधिकाऱ्यांनी आतापर्यंत झालेल्या कामाचा प्रगती अहवाल जिल्हाधिकाऱ्यांसमोर सादर केला.मतदार यादी हा लोकशाहीचा सर्वात महत्त्वाचा पाया असल्याने या कामात कोणताही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा जिल्हाधिकारी डॉ .सेठी यांनी दिला. मतदार पुनरनिरीक्षणाचे हे राष्ट्रीय कर्तव्य अत्यंत अचूक, पूर्णतः पारदर्शक आणि निवडणूक आयोगाने ठरवून दिलेल्या विहित वेळेतच पूर्ण करण्याच्या कडक सूचना त्यांनी उपस्थित सर्व यंत्रणेला दिल्या.शहरातील व ग्रामीण भागातील १८ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक पात्र तरुणाचे नाव मतदार यादीत समाविष्ट व्हावे, महिला मतदारांची नोंदणी वाढावी आणि तालुक्यातील एकही पात्र नागरिक या प्रक्रियेपासून वंचित राहणार नाही, यादृष्टीने प्रशासनाने विशेष मोहीम व दक्षता घेऊन काम करावे, असे निर्देशही त्यांनी शेवटी दिले.तालुक्यातील नागरिकांनीही आपल्या नावांची खात्री करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी स्थानिक महसूल प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

### हिरे वैद्यकीय महा.त सुविधांचा अभाव

आवश्यक असलेले मशीन उपलब्ध नाही. दीड लाख रूपये किंमतीचे ड्रिल व हॅण्डपिस मशीन नसल्यामुळे रूग्णांच्या उपचारात अडथळे निर्माण झाले आहेत. रूग्णालयात न्युरोसर्जन उपलब्ध नाही तसेच एम.आर.आय. आणि सी.टी.स्कॅन मशीन्स नसल्याने आपत्कालीन स्थितीतील रूग्णाला त्रास सहन करावा लागतो. सोनोग्राफी विभागात डॉक्टरांची संख्या कमी असल्याने रूग्णांना तासनतास लांब रांगेत उभे रहावे लागते. तातडीने डॉक्टरांची संख्या वाढवावी. रूग्णालयातील विविध वार्डस्‌मधील स्वच्छता गृहांची प्रचंड दुरवस्था झाली आहे. अस्वच्छतेमुळे रूग्णांच्या आरोग्याचा प्रश्न उभा राहिला आहे. नियोजना अभावी रूग्णांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते आहे. रूग्णालयातील सुविधांबाबत चार ते पाच महिन्यांपूर्वी निवेदन देण्यात आले होते. त्यावर अद्याप ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. रूग्णांच्या समस्या तातडीने न सोडवल्यास काँग्रेस पक्षाच्यावतीने भिक मांगो आंदोलन करण्यात येईल. भिक्षेतून मिळालेली रक्कम शासनाला, रूग्णालयाला मदत म्हणून सुपूर्द केली जाईल. व तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा काँग्रेसचे अमिन पटेल यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

### मंगळवार व बुधवार सर्व अंशत:

आले आहे. प्रत्येक शाळेने आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदवून शासनापर्यंत आपल्या न्याय्य मागण्या पोहोचवाव्यात, असे आवाहन शिक्षक समन्वय संघाच्या वतीने करण्यात आले आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी वर्षानुवर्षे प्रामाणिक सेवा बजावली आहे; मात्र त्यांना आर्थिक व प्रशासकीय न्याय मिळालेला नाही. त्यामुळे हा लढा केवळ शिक्षकांचा नसून शिक्षण व्यवस्थेच्या सन्मानासाठी असल्याचे मत समन्वयक यांनी स्पष्ट केले आहे. शासनाने तातडीने सकारात्मक भूमिका घेऊन प्रलंबित प्रश्न निकाली काढावेत, अन्यथा पुढील काळात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही शिक्षक समन्वय संघ धुळे जिल्हा समन्वयक उदय तोरवणे, ओमप्रकाश सुर्यवंशी,अशपाक खाटीक, जयपाल देशमुख, महेंद्र बच्छाव, शेखर बागुल,चेतन भामरे, विजय देसले,श्रध्देश कुलकर्णी,राम पाटील,भुषण मोरे,विजय गिरासे,कैलास पवार,अलिम खान,सिराज अन्सारी,जयेश सोनवणे,योगेंद्र पाटील,अरूण पाटील,सतिष धनराळे,दिपक पाटील, अमृतकर सर, प्रभाकर वाघ, भटु राजे, यांनी दिला आहे.

### दुचाकीवरून पडलेल्या युवकाला

सावरटसह परिसरातील नागरीकांनी धाव घेतली. या अपघातामुळे महामार्गावर काही वेळेसाठी वाहतुक विस्कळीत झाली. तसेच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून मयताचा मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठविला. या घटनेची वार्ता कळताच बेडकी गावासह परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली. तसेच मयत युवकाच्या नातलगांनीही रुग्णालयात धाव घेतली. प्रतिक गावित या युवकाचा मृतदेह पाहून त्याच्या कुटुंबियावर दुःखाचा डोंगर कोसळला. पावसाळ्यामुळे महामार्गावरील रस्ता ओला झाल्याने सदरची दुचाकी घसरली. याबाबत संबंधीत पोलिस ठाण्यात अपघाताची नोंद करण्याची प्रक्रिया उशिरापर्यंत सुरु होती.

### डी मार्ट जवळील तरुणाच्या लुटीतील

बालकास ताब्यात घेतले. त्याचेकडे चौकशी केली असता, त्याने त्याचे अन्य तीन साथीदारांची नावे सांगितली. चिरंतन ऊर्फ दादु सतिष गवळी, रा.ग.नं.७, सोनदेव बाबा वाडा, पारोळा रोड, धुळे, हर्षल राजेंद्र मेढे सहजिवन नगर, शासकीय दुध डेअरीजवळ, धुळे, दत्तात्रय ऊर्फ दक्ष दिनेश पाटील रा.हॉटेल गणपती पॅलेस जवळ, मालेगावरोड, धुळे. यांचे मदतीने फिर्यादी शोएब शाह यास लुटल्याची कबुली दिली. लुटण्यात आलेला दहा हजारांचा मोबाईल, चार हजारांची रोकड, ऑनलाईन ट्रान्स्फर केलेले नऊशे रुपये, चाळीस हजार रुपयांची गुन्हा करतांना वापरलेली मोटर सायकल एमएच१८/ सीजी-९४१४ असा एकूण चोपन्न हजार नऊशे रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपी हर्षल मेढे याचा शोध घेवून त्यास अटक करण्यात आली. उर्वरीत दोन संशयित बेपत्ता असून त्यांचा शोध सुरू आहे. संशयित हर्षल मेढे याचेविरुध्द यापुर्वीच मोहाडी नगर, धुळे शहर पोलिसात गुन्हे दाखल आहेत. पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे, उपअधीक्षक राजकुमार उपासे यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक पवार, उपनिरीक्षक संदीप काळे, हवालदार अजय जाधव, ललीचंद चौधरी, रमाकांत पवार, सचिन पाटील, इंद्रजित वैराट, शोएब बेग, अतीक शेख, सिराज खाटीक यांनी केली.



## सुलवाडे-कनोली उपसा सिंचन योजना जिल्हाधिकारी विसपुतेंनी केली पाहणी

**धुळे, दि.४- धुळेजिल्ह्यातील महत्त्वाकांक्षी सुलवाडे-जामफळ- कनोली उपसा सिंचन योजनेची जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी प्रत्यक्ष पाहणी करून प्रकल्पाच्या कामांचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी प्रकल्पातील विविध कामांची प्रगती, कालव्यांची उभारणी, पंपगृहाची स्थिती, बंदिस्त नलिका पाईपलाईन तसेच प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा घेतला. संबंधित अधिकाऱ्यांनी कामांच्या सद्यस्थितीबाबत माहिती दिली.**

जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी कामांची गुणवत्ता राखून प्रलंबित कामे नियोजित कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला दिल्या. तसेच प्रकल्पाच्या अंमलबजावणीत कोणत्याही प्रकारचा विलंब होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले.सुलवाडे-जामफळ-कनोली उपसा सिंचन योजना पूर्ण झाल्यानंतर धुळे जिल्ह्यातील मोठ्या क्षेत्राला सिंचनाची सुविधा उपलब्ध होणार असून शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादनात वाढ होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रकल्पाची कामे गतीने आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यावर भर देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी दिल्या.

पाहणीदरम्यान सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन कार्यकारी अभियंता संदीप पवार,लघुपाटबंधारे विभाग धुळे,कार्यकारी अभियंता स्वप्निल गांगुर्डे, तहसीलदार शिंदखेडा नितीन कुमार देवरे, सहाय्यक कार्यकारी अभियंता विक्रम पवार, सहाय्यक अभियंता विशाल खैरनार,संबंधित विभागाचे अधिकारी, अभियंते तसेच प्रकल्पाशी संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## जलाराम बापा मंदिरात रक्तदान शिबीर संपन्न

धुळे, दि.४ - शहरातील जलाराम बाप्पा मंदिर ट्रस्ट व व्यापारी संघाच्या वतीने जलाराम बापा मंदिर येथे गेल्या वर्षापासून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. गेल्या वर्षी जलाराम बाप्पा मंदिर ट्रस्ट व व्यापारी संघाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या वर्षी देखील ५० रक्तदाते रक्तदान करणारा असून रक्ताचा तुटवडा असल्याने अनेक रुग्णांना रक्ताची कमतरता भासत असते त्यामुळे जलाराम बाप्पा मंदिर ट्रस्ट व व्यापारी महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन करण्यात आले.

यासाठी जलाराम बाप्पा मंदिराचे अध्यक्ष राजेंद्र गुजराती, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष नितीन बंग, अशोक भानुशाली, दिनेश पटेल, संदीप मोदी, मनसुख गुजराती आदी उपस्थित होते.

## निधन वार्ता

### देविदास जगताप

नंदुरबार, दि.४ (प्रतिनिधी)- तालुक्यातील धामडोद येथील रहिवासी देविदास बापुराव जगताप यांचेवृध्दपकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९३ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सुंदरदे येथील माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक पुरुषोत्तम जगताप आणि युवराज जगताप यांचे ते वडील होत.




## उठावणा



स्व लालचंदजी बाळारामजी गौड (गौड सर) इनकी धर्म पत्नी, श्री प्रदीप लालचंदजी गौड (बंडू नाना) इनकी पूज्य माताजी एवं जयेश, निलेश, मयूर, निखिल एवं शशांक कि दादीजी

**श्रीमती शांताबाई लालचंदजी गौड**

इनका स्वर्गवास दिनांक ०३ जुलै २०२६ वार शुक्रवार को शाम ६:०५ बजे होगया है। उनका **उठावणा** रविवार दि ५ जुलै २०२६ को शाम ४ बजे निलकंठेश्वर महादेव मँदिर के सभाग्रुह, जयशंकर कॉलनी, चाळीसगाव रोड, धुळे पर रखा है।

-: शोकाकुल :-

महर्षि (गौड) परिवार, धुळे

**जागा भाड्याने देणे**

शहरातील मध्यवर्ती ठिकाणी आग्रारोड श्रीराम मंदिरा मागे ग.नं.३ येथील १०६० दुकान, ऑफिस, गोडाऊन कमर्शियल सेमी बेसमेंट जागा भाड्याने देणे आहे

-: संपर्क :-

9822752149

**पाहिजेत**

रेडिमेड दुकान कामासाठी काम करणारी हुशार मुले पाहिजेत.
त्वरीत भेटा आकर्षक पगार
श्रीसत्यनारायण ड्रेसेस
ग.नं.२, जैन मंदीराजवळ, धुळे फो. 236485

**भाड्याने देणे आहे**

नवतेज बाजार समोर कालीका प्रोव्हीजन जवळ देवपूर तीन रुमचे स्वतंत्र घर कंपनीस, ऑफिस, फॅमेलीस भाड्याने देणे आहे.

- संपर्क -

8055404946
8421461410

**डिटीपी ऑपरेटर पाहिजेत**

इनडिझाईनमधे काम करु शकणारा डिटीपी ऑपरेटर चांगल्या पगारावर नेमणे आहे.

-: संपर्क :-

दै.आपला महाराष्ट्र 9422286496

**प्रवेश सुरु २०२६-२७**

क.ब.चौ.उ.म.वि.जळगाव यांच्या संलग्नतेने सत्कार्योत्तेजक सभेचे भारतीय विद्या संशोधन केंद्र, रामवाडी धुळे येथे खालील अभ्यासक्रमाचे प्रवेश देणे सुरु आहे.

१. **पी.जी.डिप्लोमा इन गायडन्स ॲण्ड कौन्सीलींग** - १ वर्ष
२. **ज्येष्ठांचे मानसशास्त्र व समुपदेशन** - ६ महिने
३. **संस्कृत भाषा परिचय आणि संभाषण कौशल्य** - ६ महिने
४. Certificate Course in Communicative English - ३ महिने
५. **प्रमाणपत्र अभ्यासक्रम- मोडीलिपी** - ३ महिने

अखिल भारतीय कीर्तन संस्था दादर यांच्या

१. **कीर्तनालंकार पदवी अभ्यासक्रम** - साडेतीन वर्ष

जागा मर्यादित आहे. आपला प्रवेश आजच निश्चित करा.

संपर्क :- डॉ.एन.एम.जोशी

9421500882, 9146768700, 9623143714

**हॉटेल भाड्याने देणे**

धुळ्यात मध्यवर्ती ठिकाणी चालू स्थितीतील हॉटेल भाड्याने देणे आहे.

9403300128

**दुकान विकणे आहे**

फॉरचुन प्लाझा शॉप नं.११, संतोषी माता चौक, ओस्वाल बोर्डींगच्या शेजारी, सुयोजित लॅबच्या बाजुला ग्राऊंड फ्लोअर

8806950799

**प्लॉट विकणे आहे**

देवपूर शिवार S.N.92 येथील (इंडस्ट्रीयल) ५५०० स्क्वे.फुट प्लॉट योग्य किंमत आल्यास देणे आहे.

-: संपर्क :-

9623608264

**पाहिजेत**

मारुती व्हॅन चालवण्यासाठी अनुभवी ड्रायव्हर पाहिजे.

- संपर्क -

9730979042

**जागा विकणे आहे**

भरत नगर फ्लॅट नं.९ साईज ३६५० स्क्वे. फूट विकणे आहे

-: संपर्क :-

9422774591

**पाहिजेत**

एके मीडिया धुळे या अग्रगण्य जाहिरात एजन्सीला खालील पदांसाठी उत्साही व मेहनती उमेदवारांची आवश्यकता आहे.

» वसुली प्रतिनिधी - 1
पदवीधर व मोटार सायकल आवश्यक

» डीटीपी ऑपरेटर - 2
कोरल-फोटोशॉप, मराठी टायपिंग आवश्यक

अर्जासह भेटा: स. ११ ते संध्या. ७ पर्यंत

एके मीडिया
पहिला मजला, सत्यम आर्केड, पतंजली स्टोअर्स समोर, नगरपट्टी, धुळे.
94222 86280

**पाहिजेत**

२ नोझल बॉय पाहिजेत.
संपर्क :- मॅनेजर
श्रीराम पेट्रोल पंप
बारा पत्थर शिवाजी पुतळ्याजवळ, धुळे.
9552939820
9834311141

**पाहिजेत**

BAMS/ BHMS DOCTORS
२ जागा
CONTACT.
7588517991

**कुलिंग इंडिया की पहचान**

Symphony
Crompton

आत्ता पर्यंतच्या कुलर्सच्या तुलनेत सर्वात स्टायलिश मॉडेल्स'



आता खरेदी करा कूलर 0% EMI वर

BAJAJ FINSERV 0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.

नियम व अटी लागू

ak media- 238222

58 वर्षापासून आपल्या सेवेत...

अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही

श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोनः 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०